## ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २६.०३.२००९

### मा.नौपाडा प्रभाग समिती सभा

सभा सूचना क्र.१, दिनांक :- २६.०३.२००९

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती ____________________
सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महोदय/महोदया,

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार, दि.०४ एप्रिल २००९ रोजी दुपारी १२.१५ वा. महापालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह, दुसरा मजला येथे सभा सूचना क्र.०१, दि.२६.०३.२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचारविनियम करण्यांसाठी आयोजित करण्यांत येत आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित राहावे, ही विनंती.

मा.अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग ह्यांचे मान्यतेने,

**(प्र.म.निंबर्गी)**
उप-आयुक्त (सचिव)
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सूचना क्र.०१, दि.२६.०३.२००९ रोजीची विषयपत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
| --- | --- |
| १. | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९ पोटकलम (अ) (४) अन्वये, सन २००९-२०१० करीता मा.नौपाडा प्रभाग समितीवर आसणाऱ्या एका सदस्याची ''अध्यक्ष '' प्रभाग समिती या पदावर नेमणूक करणेबाबत. |

महापालिका सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,
दिनांक :- २६.०३.२००९

**(प्र.म.निंबर्गी)**
ठाणे उप-आयुक्त (सचिव)
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

टीप :- विषयपत्रिकेसोबत
१) निवडणूक कार्यक्रम, (२) नामनिर्देशन पत्र नमुना, (३) उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज
२) नामनिर्देशन पत्र सचिव कार्यालयात स्विकारली जाईल.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

नौपाडा प्रभाग समिती कार्यालय,
दिनांक :- १८.०६.२००९

## मा.नौपाडा प्रभाग समिती सभा

सभा सूचना क्र.२, दिनांक :- १८.०६.२००९
सभा क्र.१, दिनांक :- २४.०६.२००९

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती ____________________
सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा बुधवार, दि.२४.०६.२००९ रोजी दुपारी ०४.०० वा. मा.नौपाडा प्रभाग समिती कार्यालय येथील ‘‘कै.मो.दा.जोशी सभागृह’’ येथे सभा सूचना क्र.२, दि. १८.०६.२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचारविनियम करण्यांसाठी आयोजित करण्यांत येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित राहावे, हि विनंती.

(राजेंद्र फणसे)
प्रभाग अधिकारी / सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा सूचना क्र.०२. दिनांक :- १८.०६.२००९ ची विषयपत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| २. | ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.२८.०१.२००९ (तहकुब), दि.१७.०२.२००९ व दि.०४.०४.२००९ (मा.अध्यक्ष निवड) रोजी झालेल्या सभांचे इतिवृत्तांत कायम करण्याबाबत. |
| ३. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६० मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत डेकोरेटीव्ह वुडन बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ४. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६० मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत बाबु नारळवाले दुकानासमोर गटार बनविणे व गणेश मंदिरसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |

सचिव कार्यालय,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालका, ठाणे.
दिनांक :- १८.०६.२००९

(राजेंद्र फणसे)
प्रभाग अधिकारी/सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा.अध्यक्ष महोदया, यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारी आयत्यावेळेची प्रकरणे

| आ.वे.प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत एस.एफ.आर.सी. कव्हर्स बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ६ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत काजुवाडी येथील फेरोनगर चाळ व बेचेन मिस्त्री चाळ जवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत साईबाबा मंदिर जवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ८ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत काजुवाडी येथील श्रीरामचाळ जवळील परिसरांत गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ९ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत रामचंद्र नगर १ मधील जयमहाराष्ट्र चाळीजवळ पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १० | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६७ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत सर्व्हीस रोड येथील नटराज सोसायटीसमोरील फुटपाथ नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ११ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६२ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत जिजामाता मार्केट येथे गटारावर स्टील झाकणे बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १२ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत लालबहादुर शास्त्री मार्ग येथील मोहन महल ते नागेश सोसायटीपर्यंत पदपथावरील पेव्हर ब्लॉक्स बसविणे, रंगरंगोटी करणे ई.कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १३ | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६५ मध्ये प्रभाग सुधारणा निधीअंतर्गत ब्राह्मण सोसा., बी-केबीन येथे गटारावरील झाकणे बसविणे, म.गांधी रस्ता येथे कर्बस्टोन बसविणे ई.विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

सचिव विभाग,
नौपाडा प्रभाग समिती,
दि.१७-२-२००९.

प्रति,
श्री/श्रीमती............................
सन्मा.सदस्य/सदस्या,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा मंगळवार दि.१७-२-२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती कार्यालयातील कै.मो.दा.जोशी सभागृहामध्ये सभा सुचना क्र.०८ दि.२०/०१/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करणेत आली होती. सदर सभेचे इतिवृत्त खालील प्रमाणे :-

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सौ.शांता सोलंकी | अध्यक्षा |
| २. | मा.सौ.सुहासिनी लोखंडे | सदस्या |
| ३. | मा.सौ.सुजाता पाटील | सदस्या |
| ४. | मा.सौ.अनिता फर्डे | सदस्या |
| ५. | मा.सौ.स्मिता देशमुख | सदस्या |
| ६. | मा.श्री.अशोक वैती | सदस्य |
| ७. | मा.श्री.नारायण पवार | सदस्य |
| ८. | मा.श्री.पुंडलिक थोरवे | स्विकृत सदस्य |
| ९. | मा.श्री.मुकूंद जाधव | स्विकृत सदस्य |
| १०. | मा.श्री.प्रकाश पायरे | स्विकृत सदस्य |

सभेस खालील सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.विलास सामंत | सदस्य |
| २. | मा.श्री.संजय वाघुले | सदस्य |
| ३. | मा.श्री.महदिप बिष्ट | सदस्य |

मा.प्रभाग अधिकारी :- (सभेची विषयपत्रिका वाचून दाखवितात)

श्री.मुकूंद जाधव :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीच्या सन्मा.सदस्या सौ.स्मिता देशमुख यांची स्थायी समिती सदस्य पदावर निवड झाली आहे. त्याचबरोबर सन्मा.सदस्या सौ.सुजाता पाटील यांची देखील जिल्हा नियोजन समितीवर निवड झाली आहे. त्याबद्दल आपण त्यांचे मा.अध्यक्ष महोदयांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करु या.

(नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्या सौ.स्मिता देशमुख आणि स्थायी समिती सदस्या सौ.सुजाता पाटील यांचा मा.अध्यक्ष महोदया यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येतो)

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, मी एका गोष्टीच्या बाबत सर्व सन्मा.सदस्य व सर्व अधिकारी वर्गास विनंती करतो की, आपली प्रभाग समितीची सभा होते. तिला किरकोळ न समजता अती महत्वाची समजून वेळेवर या सभेसाठी उपस्थित रहावे अशी मी सर्वांना विनंती करतो. सर्व अधिकारी सभेस उपस्थित राहत नाहीत. तरी याबाबत आपण दक्षता घ्यावी अशी आपल्याला विनंती आहे.

मा.अध्यक्ष महोदया, प्रत्येक खात्याचे अधिकारी बदली झालेले आहेत. त्यांचे फोन नंबर व त्यांचे कार्याबाबतची माहिती मा.सचिव महोदयांकडे जमा करावी म्हणजे ते आम्हाला एकत्रितरीत्या देतील. ड्रेनेज विभागाचे कोण अधिकारी आहेत ?

मा.अध्यक्ष महोदया, भारताचे माजी राष्ट्रपती आर.वेंकटरमण यांचे दु:खद निधन झाल्यामुळे आपण दि.२८-१-२००९ रोजीची आपली सभा तहकूब केली होती. ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार नागरिकांची कामे जलदगतीने व्हावी म्हणून आपण प्रभाग समित्यांची स्थापना केली. परंतु त्यातून साध्य काय झाले ? नागरिकांची लहान सहान कामे आपण मा.महासभेत घेऊन जाऊ शकत नाही. ती आपल्याला प्रभाग समितीच्या माध्यमातून पूर्ण करावी लागतात. म्हणून माझी अधिकारी वर्गाला विनंती आहे की, आपण जातीने लक्ष देऊन सदर सभेला माहिती द्यावी. मला असे म्हणावयाचे आहे की, लहान लहान कामे असतात. ती आपण प्रत्येक वेळेला महासभेमध्ये अथवा स्थायी समितीच्या सभेमध्ये नेऊ शकत नाहीत. आज ज्येष्ठ नगरसेवक मा.श्री.अशोक वैती साहेब आलेले आहेत. प्रभाग अधिकारी दगडे साहेब सुध्दा आहेत, सहाय्यक आयुक्त शिंदे साहेब सुध्दा आहेत. पण तुम्ही मला एक गोष्ट सांगा की, कचऱ्याचे साठलेले ढिग आहेत, गटारावरील जाळया आहेत, पाण्याची गळती होत आहे यासारख्या छोटया छोटया गोष्टी आपण महासभेमध्ये काढु शकत नाही. ही कामे आपण या सभेमध्येच पूर्ण करु शकतो. माझे म्हणणे वेगळे आहे. सर्व सदस्यांनी व अधिकाऱ्यांनी आपल्या सभेकडे गांभिर्याने पहावे. महासभेपेक्षा जास्त महत्व द्यावे. महासभेमध्ये मोठी प्रकरणे सुटतात. नागरिकांच्या जिव्हाळयाचे प्रश्न आहेत. त्यामुळे या गोष्टीकडे जास्त गांर्भियाने लक्ष द्यावे अशी विनंती मी सर्वांना करीत आहे. धन्यवाद.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीमधील आपल्या सहकारी सदस्या सौ.सुहासिनी लोखंडे यांनी स्थायी समिती सदस्या म्हणून आपले दुसरे वर्ष सुरु केले आहे. त्याबद्दल आपण त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करु या. आज आपल्या प्रभाग समितीमधील दोन सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत. त्यामुळे मी अशी अपेक्षा करते की, आपल्या प्रभाग समितीमधील कामे आता जलदगती मार्गाने पूर्ण होतील. या दोन्ही सदस्यांनी स्थायी समितीच्या माध्यमातून नौपाडा प्रभाग समितीमधील सर्व सहकारी सदस्यांच्या प्रभागातील कामे होण्याच्या दृष्टीकोनातून आपली भूमिका मांडावी.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्या सौ.सुजाता पाटील यांनी दोन नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्यांना विनंती केली आहे. त्यास मी दुजोरा देत आहे. या नवनिर्वाचित सदस्यांनी त्यांच्या विनंतीस मान देऊन प्रभागातील जास्तीत जास्त कामे पूर्ण होण्याकरीता प्रयत्न करावेत अशी विनंती मी आपल्याला करीत आहे.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागातील राजमाता वडापाव सेंटर येथील गटारावर घाण झ ाालेली आहे. त्या ठिकाणी सांडपाणी वाहत आहे. तसेच रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. हे सांडपाणी कोठुन येते याची माहिती नाही. येथील नागरिक सतत तक्रारी करत असतात. त्यामुळे याची चौकशी करुन वाहणारे सांडपाण्याचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा. राजमाता वडापाव येथील गल्ली नंबर २ येथे.

श्री.पी.आर.पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, राजमाता वडापाव सेंटर येथील सांडपाणी रस्त्यावर येत आहे. त्या ठिकाणच्या मालकाला आजच नोटीस दिलेली आहे. मला आजच लोखंडें साहेबांचा फोन आला होता. त्यानुसार आम्ही कार्यवाही केलेली आहे.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, हे सांडपाणी तीन ते चार महिन्यांपासुन वाहत आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांना असे म्हणावयाचे आहे की, हा प्रश्न तीन ते चार महिन्यांपासुन आहे. आणि आपण सांगत आहात की, आजच आम्ही नोटीस संबंधितांना दिलेली आहे. मागच्या सभेमध्ये देखील प्रश्न आला होता. ही काय भानगड आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.पी.आर.पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, आम्ही आजच नोटीस दिलेली आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, परंतु हा प्रश्न तीन महिन्यांपासुन आहे. याकडे दुर्लक्ष का करता आपण.

श्री.पी.आर.पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, आमच्या पर्यंत ही तक्रार आलेली नव्हती.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, परंतु आमच्याकडे ही तक्रार आलेली आहे. नौपाडा प्रभागाला तीन रिमायंडर आलेले आहेत. त्या ठिकाणी जी गल्ली आहे तिची दुरावस्था झालेली आहे. या ठिकाणी वाहणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरात मच्छरांचे प्रमाण वाढलेले आहे. रोगराई पसरण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊन लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी.

श्री.पी.आर.पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, कारवाई करुन घेतो.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या ड्रेनेज विभागाबाबत आमचे मत अतिशय वाईट झालेले आहे. सर्वसामान्य माणसाला ड्रेनेजची गाडी कधीच मिळत नाही. सदस्यांनी फोन केला तर दोन दिवसांनी मिळते. २०० ते ३०० रुपये दिले तर लगेचच गाडी मिळते असा माझा आरोप आहे. यावर आपण काय कार्यवाही करणार आहात याचा खुलासा कृपया करण्यात यावा. उघडउघड गाडीवरील कर्मचारी नागरिकांकडे पैसे मागत आहेत. माझ्या डोळयासमोरची घटना आहे. यावर काय उपाययोजना होणार आहे याचा खुलासा करण्यात यावा. सर्वसामान्य माणसांना पैसे मोजावे लागत आहे. मला या गोष्टीची लाज वाटते.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, त्यांना देखील प्रभाग समितीच्या मिटींगला बोलाविण्यात यावे.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, सगळयांची तक्रार आहे.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, येथील रस्ता ठिकठिकाणी तुटलेल्या अवस्थेत आहे. त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अथवा पेव्हर ब्लॉक लावण्यात यावेत. राजमाता वडापाव सेंटरच्या दुकानासमोर कुंडया लावलेल्या आहेत. त्यांनी तेथे अतिक्रमण केलेले आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी ठेवण्यात आलेल्या कुंडया हटविण्यात याव्यात. त्यांनी तीन वेळा रिमायंडर दिलेले आहे. तरीही हालचाल होत नाही. राजमाता वडापाव येथील तासकर हाऊसच्या समोर आईसक्रीमचे दुकान आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर घाण करण्यात येत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्याचा खुपच त्रास होत आहे.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, चौकशी करुन कारवाई करतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, तसेच तेथे गाडया कुठेही पार्किंग करण्यात येतात.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, कारवाई करण्यात येईल.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी आईसक्रीमचे दुकान कोणी टाकलेले आहे याची चौकशी करण्यात यावी.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, सदरची बाब आरोग्य विभागाशी संबंधित असल्याने ती त्यांना कळविण्यात येईल.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, बेडेकर हॉस्पिटल येथे शिरिषकुमार बालोद्यान आहे. मंदिर आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर दुचाकी वाहनांची पार्किंग करण्यात येत आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, सदर ठिकाणी करण्यात येणाऱ्या पार्किंगबाबत मी माहिती घेतो आणि पुढील कार्यवाही करतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, चौकशी करुन आपण काय कार्यवाही करणार आहात ते सांगा.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, टोविंगवाल्यांकडून माहिती घेऊन आपल्याला ती देतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, आज संध्याकाळी लोक मला भेटायला येणार आहेत. त्यांनी तीन रिमायंडर्स दिलेले आहेत. तुम्ही वाट कशाला बघत आहात.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, प्रत्येक ठिकाणी आमची कारवाई सुरु असते.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, बेडेकर हॉस्पिटलच्या समोरचे रस्ते पुर्णपणे पार्किंगने, फेरीवाल्यांनी भरलेले असतात. मार्केटमधल्या लोकांना लायसन्स दिलेले आहे. त्यांना हटवू नका. नवीन आलेले आहेत त्यांना हटवा. कारवाई करताना त्यांना जाब विचारा. जे रस्त्यावर धंदा करत आहेत त्यांना आपण हटवू शकतो. नागरिकांना त्याचा त्रास होत आहे याचा विचार करावा. मार्केटचा कचरा इतरत्र फेकला जातो.

श्री.मुकूंद जाधव :-

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणच्या चारही गल्ल्या पार्किंगने भरलेल्या आहेत. त्यांना काही नियम वगैरे आहे की नाही. मागे पण मी सांगितले होते.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, अर्ध्या गल्ल्या आहेत.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, याबाबतचा प्रस्ताव बनवुन पुढे पाठवून देऊ.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, हरिनिवासजवळ दमाणी बसस्टॉप येथील फुटपाथवर कार्यालय बांधले होते. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर टेम्पो उभे राहतात. त्यावर काय कारवाई केली ?

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, सदर ठिकाणी पोलिस बंदोबस्त मिळाल्यावर कारवाई करुन घेतो.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी कायम स्वरुपी टेम्पो उभे असतात. असे असेल तर त्या ठिकाणी नो पार्किंगचा बोर्ड लावा. परवा त्या ठिकाणी कार्यक्रमासाठी खासदार आले होते. त्यावेळी तेथे टेम्पो होते. कचऱ्याचे ढिग पडलेले होते. कचरा उचलण्यात आला नव्हता. या ठिकाणी पोस्ट या ठिकाणी पोस्ट ऑफिस आहे. येथे लोक येतात. महापालिका काय करते याचा खुलासा करण्यात यावा. सर्व्हिस रोडवर सेलसाठी गाडया ठेवतात. त्यांना दंड लावण्यात येणार आहे की नाही. आपण त्यांच्या काही कारवाई करणार आहोत की नाही.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, सर्व्हिस रोडला शोरुमच्या गाडया लावण्यात येतात. सदरची बाब वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. सन्मा.सदस्या सौ.सुहासिनी लोखंडे मॅडमनी गांवदेवी मार्केटचा मुद्दा उपस्थित केला आहे. दोन तीन वेळा त्यावर कारवाई केली आहे. ती कारवाई आम्ही पोलिस बंदोबस्ताशिवाय केली होती. परंतु प्रत्येक बंदोबस्ताशिवाय कारवाई करता येत नाही. पोलिस बंदोबस्त मिळाल्यावर आम्ही प्रभावीपणे कारवाई करतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, त्यांच्याकडे कागदपत्रे असल्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ?

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, कारवाईसाठी आम्ही गेलो तर ते त्यांच्याकडील ताबा पावती दाखवतात. १५४ ॲलॉटमेंट केलेली लेटर्स आहेत. त्यांना सोडुन आपण हटवू शकतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी नवीन कितीतरी फेरीवाले वाढलेले आहेत.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, पे ॲण्ड पार्कबाबत विचारणा केलेली आहे. मुख्य रस्त्यांवर पार्किंग दिलीच पाहीजे. हा मुख्यालयाचा प्रश्न आहे. सन्मा.सदस्यांच्या भावना आहेत प्रस्ताव बनवून पे ॲण्ड पार्क देऊ नये. मुख्यालयाशी चर्चा केली. कुठे पार्किंग दिली, रहदारी, ठेकेदारांना नियमन कसे करावे याबाबत त्यांनी सुचना देण्यात येईल. आपल्या सुचनेनुसार प्रस्ताव पाठविण्यात येईल.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, ती पहिली गल्ली अर्धी आहे. एकच बाजुला हटविली तरी चालेल.

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, पार्किंग संदर्भात आपण निश्चित केलेले नियम हे सर्वांनीच पाळले पाहीजे. पार्किंग मग ती कुठलीही असेल. महापालिकेकडे या रस्त्यांची लिस्ट आहे. आज त्यांची याबाबत तक्रार आहे. पार्किंग प्लॉटसाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. ट्रॅफिकला पत्र दिले आहे. ट्रॅफिकची लिस्ट आहे. अतिक्रमण होत आहे. किती पार्किंग ॲलॉट केलेले आहे हे पहा. काही ठिकाणी फ्रि पार्किंग आहे. बोर्ड लावलेले आहेत. लोकांना त्रास होऊ नये म्हणून हे सर्व चालले आहे. आम्ही लोकांसाठी सर्व काही करण्यासाठी तयार आहोत. प्रत्येक ठिकाणी चांगली सोय झाली पाहीजे. मार्केटमधील लोकांची तशी मानसिकता नाही. हातगाडया बाहेर लावतात. नवीन लोक आहेत. मार्केटमधील अध्यक्ष असतील. त्यांच्या काही सूचना होत्या. अनधिकृत हातगाडया लावतात. त्यांच्यावर कारवाई करा. दोन तीन वेळा कारवाई करा. नागरिकांना येण्याजाण्यासाठी मोकळा रस्ता ठेवा. परंतू असे होत नाही. पुन्हा पुन्हा हातगाडया लावल्या जातात. जे फेरीवाले रस्त्यावर बसलेले असतील त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था चांगली होऊ शकते त्या ठिकाणची नावे मुख्यालयाला पाठवा.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे पोलिसांना विनंती करुन पोलिस बंदोबस्तात कारवाई करण्यात येईल. पार्किंगबाबत सांगितल्याप्रमाणे प्रस्ताव बनवून पे ॲण्ड पार्क व मार्केटबाबत पाठपूरावा करु. अतिक्रमण कारवाई प्रभावीपणे करण्यात येईल. अतिक्रमण विभागाकडे आणखी एक लिपिक असणे आवश्यक आहे. प्रभाग समितीकडील इंजिनियर पूर्ण वेळ अतिक्रमण विभागासाठी उपलब्ध होत नाही.

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, अतिक्रमण विभागासाठी लिपिक नाही. काही लिपिक हे दुसरेच काम करतात. हे योग्य आहे का ?

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, अतिक्रमण विभाग जवाहरबाग येथील लिपिक श्री.मालुस्कर यांची बदली झ ाली होती.

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, वागळे प्रभाग समितीला का ?

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, वागळे प्रभाग समितीकडे श्री.थोरवे हे काम करतात. ते आपल्या आस्थापनेवर नाहीत. नौपाडा प्रभाग समितीकडील पत्रव्यवहाराचे काम श्री.ठाकूर हे पाहतात.

मा.अध्यक्ष महोदया, मा.आयुक्त साहेबांकडे यासंदर्भात चर्चा झालेली आहे. कारवाई करताना पोलिस बंदोबस्त मिळत नाही. कारवाई करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सहाय्यक पोलिस आयुक्त श्री.माळवे यांचेबरोबर चर्चा झालेली आहे. प्रभाग समितीकडे आणखीन तीन लिपिक दिले तर कारवाई अधिक प्रभावीपणे करता येईल. स्टेशन परिसरात सॅटीसचे काम चालू आहे. खाजगी बिगारी लावून कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, स्टेशन परिसरात १० सुरक्षा रक्षक आहेत. त्यांच्यावर कामाची जबाबदारी आहे का ? आपले बिगारी कर्मचारी गांवदेवी मंदिर येथे उभे राहत असतात. पोलिस आयुक्तांबरोबर मिटींग होते. कारवाई होते की हे मला माहिती नाही. तुम्ही सांगता आम्ही कारवाई करतो. महिन्याचे तिसही दिवस माणसे स्टेशनला बसून व्यवसाय करतात. यासाठी आपल्याला पोलिसांची आवश्यकता आहे. शाळेतील मुले ये-जा करीत असतात. घरी जाणाऱ्या माणसांची घाई सुरु असते. पोलिस स्टेशनला यासंदर्भात पत्र दिलेले आहे. गोखले रोडला फेरीवाले बसलेले असतात, राम मारुती रोडला पण तीच परिस्थिती आहे. प्रत्येक वेळी कारवाई करतो अशी उत्तरे आम्हाला देण्यात येतात.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, आम्ही फेरीवाल्यांवर वेळोवेळी कारवाई करीत असतो.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, परंतु २५ दिवस फेरीवाले बसलेले असतात. आम्ही दाखवून देऊ का आपल्याला ? त्यांना पाच हजार रुपये दंड लावा. आम्ही प्रभाग समितीच्या सभेमध्ये ठराव करण्यास तयार आहोत. प्रस्ताव करुन आपण पाठवा आम्ही तो मंजूर करतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, राजमाता वडापाव सेंटर येथील गल्लीमध्ये डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता लागणार आहे. डांबरीकरणाचे टेंडर आहे. त्यास आयुक्त साहेबांची मान्यता घेतलेली आहे. ज्या अंडरग्राऊंड सर्व्हिसेस आहेत म्हणजेच एमजीएल, एमटीएनएल, एमएसईबीवाले यांना आपण खोदण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यांची कामे चालू आहेत. पाणी खात्याशी संबंधित कामे आहेत ती त्यांनी करुन घेतली पाहीजे. इतर संस्थांनी खोदाई केलेली आहे. त्यांचे पैसे जमा केलेले आहेत. ते काम शेवटच्या टप्प्यामध्ये आहे. काही दिवसात कामे चालू करु शकतो. मा.स्थायी समितीमध्ये मंजूरी मिळालेली आहे. येत्या ८ ते १० दिवसात ड्रेनेजची कामे चालू होतील. पावसाळयामध्ये कोणाच्या काही तक्रारी असतील त्या सोडविण्याची आमची तयारी आहे.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागात वोडाफोनची केबल टाकण्याचे काम चालू आहे. पेव्हर ब्लॉक काढून बाजूला ठेवलेले आहेत.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, सदर कामावर श्री.खडताळे हे देखरेख ठेवतात.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा पोलिस स्टेशनपासुन काम झाले आहे. पुढचे काम चालू आहे. खड्डे खोदतात. परंतु ते बुजवित नाही. त्यामुळे नागरिक आमच्याकडे तक्रारी करतात. ते जर खड्डे बुजवणार असतील तरच त्यांना आम्ही काम करुन देऊ.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, याची फाईल मंजूर नाही. ती स्टॅण्डींग पुढे पडून आहे. आपण परवानगी देण्याचे थांबवित आहोत. वर्कऑर्डर इश्यू करुन परवानगी देणार आहोत.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, हरिनिवास सर्कल येथे एमटीएनएलवाले नेहमीच खोदाई करीत असतात.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, एमएसईबीवाल्यांकडून ........

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, आपली तयारी असेल तरच परमिशन द्या. आमच्या येथे आम्ही खोदूनच देत नाही. त्यांनी खड्डे बुजविले नाही तर त्यांचे सामान आम्ही जप्त करुन घेतो. आम्ही त्यांना विचारुन घेतो की, किती दिवसात हे काम पूर्ण करणार ? ते काम केले नाही तर पोलिस स्टेशनला कम्प्लेंट करुन आपण कारवाई करु शकतो. एखादा अधिकारी जरी असेल तर त्यांच्यावर आपण एनसी दाखल करु या. आपण देखील त्यांना पत्र पाठवून हे काम आपण किती दिवसात करणार आहात याबाबत विचारणा करावी. अन्यथा त्यांना कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, ठिक आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, एमएसईबीसंदर्भात मी पवार साहेबांना फोन लावत होतो. महापालिकेची पाईपलाईन गेलेली आहे. हरिनिवास येथून. त्यासंदर्भात आपला काय विचार आहे. आपण तयार आहात का ?

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, नॉर्म्सप्रमाणे एमएसईबी आणि वॉटर सप्लायच्या पाईपलाईन ठराविक अंतरावर असल्या पाहीजेत.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, आपली महापालिकेची पाण्याची लाईन गेलेली आहे. नियमानुसार ती अडीच फुट खाली जायला पाहीजे. आपली दिड फुटावर आहे. त्यांची लाईन खाली न टाकता वरुन टाकलेली आहे. उद्या जर काही प्रकार घडला तर याला जबाबदार कोण राहणार आहे ?

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, असे काही स्पॉटस आमच्या लक्षात आलेले आहेत. केबल हटवायला सांगितले आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, मघाशी विषय निघाला होता. आपण जबाबदार अधिकारी आहात. लक्ष द्या.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, गांवदेवी भाजी मार्केटच्या येथे गोडाऊन आहे. फुटपाथला लागूनच भाजीवाले बसलेले आहेत. सगळा परिसर कॅप्चर केलेला आहे. लोकांना चालता येत नाही. सगळीकडे भाजीवाले बसलेले आहेत. घाण टाकतात. प्रायव्हेट बसेस असतात. तेथून आपल्या बसेसही येतात. ट्रॅफिक जाम होते. सामान्य लोकांना चालता येत नाही.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी आम्ही वेळोवेळी कारवाई करीत आहोत. आमचे ७-८ कामगार असतात. स्टेशन परिसरात दोन ते चार हजार फेरीवाले असतात.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, फुटपाथवर गाडया लावलेल्या असतात.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, आम्ही आठ दहा दिवसात गाडया तोडलेल्या आहेत. ठिकठिकाणी वेळोवेळी कारवाई होत असते.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, मग चालण्यासाठी रस्ता आहे का हे सांगा. फुटपाथ व्यवसाय करण्यासाठी आहे का चालण्यासाठी. मी स्वतः बघते. काहीही कारवाई झालेली नाही. आताही त्या ठिकाणी सगळे भाजीवाले बसलेले आहेत.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, अतिक्रमण विभागाकडे एकच गाडी असते. ते भरपूर ठिकाणी फिरतात. आजुबाजूच्या गल्ल्यांमध्ये देखील फिरत असतात. पोलिस पथक असल्यावर कारवाई करण्यात येते. संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करायला सांगितले आहेत. त्यांची नावे मिळाल्यावर कारवाई करतो.

सौ.सुहासिनी लोखंडे :-

मा.अध्यक्ष महोदया, लोकांना स्टेशनवरुन चालणे मुश्किल होणार आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, सहाय्यक आयुक्त साहेबांचे म्हणणे आम्ही ऐकले. आमच्याकडे एकच गाडी आहे. ती सतत फिरत असते. एका ठिकाणी गाडी गेल्यावर तेथील फेरीवाले गल्ल्यांमध्ये घुसतात आणि थोडयावेळाने गाडी गेल्यावर पुन्हा रस्त्यावर येऊन बसतात. मी ७ वर्षे या सभागृहात आहे. हा जो प्रश्न आहे तो मी गेल्या ७ वर्षापासुन ऐकत आहे. फक्त सन्मा.सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे आणि सोडून द्यायचे.

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे टोविंग वाहनावर ५ कर्मचारी आहेत. संपूर्ण अतिक्रमण विभाग मुख्यालयाच्या ताब्यात आहे. उपआयुक्त साहेबांना डेली रिपोर्ट करायला लागतो.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, मागे कोणीतरी प्रश्न उपस्थित केला होता. २२ जॅमर मागविले होते त्याचे काय झाले.

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, ते त्यांच्याकडेच असतात. आपण त्यापोटी ६०० रुपये दंड वसूल करतो.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे टोविंग गाडी असते. त्याच्यावर ७-७ माणसे असतात. बऱ्याच ठिकाणी लोक दंड देत नाहीत. कारण या ठिकाणी आमचे ऑफिस आहे म्हणून गाडी लावली. १-२ गाडया उचलल्यावर लगेचच ते जातात. लोकांवर वचक बसणे आवश्यक आहे.

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, पुणे महानगरपालिकेने याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. तसे आपल्याकडे देखील झाले पाहीजे. लोकांना त्रास होऊ नये अडचण होऊ नये म्हणून हे करावे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, मी मागील ४-५ वर्षांपासुन छोटया अग्निशमन गाडीची मागणी करीत आहे. कारण काही ठिकाणी लहान रस्ते आहेत त्या ठिकाणी मोठी गाडी जाऊ शकत नाही. त्या ठिकाणी लहान गाडीची आवश्यकता असते. मी सतत मागणी करीत आहे. अधिकाऱ्यांना काहीही वाटत नाही असे मला वाटायला लागले आहे. मी फायर ब्रिगेडच्या छोटया गाडीची मागणी केलेली आहे. रस्त्यावर ऑईल पडल्यावर तर अपघात होऊ नये म्हणून फायर ब्रिगेडच्या गाडीने ते ऑईल धूवून काढले जाते. त्याबाबतच्या विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. तसेच राखीव भुखंड क्र.५ ६९ अ, ६९ब याबाबत पाठपूरावा का होत नाही आणि मला वाटते मागच्या सभेमध्ये सिग्नलजवळ पेव्हर ब्लॉक बाबत मी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी पवार साहेबांनी मला शब्द दिला होता. तसेच दुसरी विनंती अशी आहे की, आपल्या प्रभाग समितीच्या क्षेत्रात ११ महापुरुषांचे पुतळे आहेत. त्याची स्वच्छता व निगा राखण्यात यावी. फक्त जयंती अथवा पुण्यतिथी आली की मगच यांची आठवण प्रशासनाला होते का. जांभळीनाक्यावरील धर्मवीर आनंद दिघे टॉवर आहे त्याची नावांची अक्षरे पडलेली आहेत. त्याची स्थिती बकाल झालेली आहे. तरी त्याची निगा व्यवस्थित व्हावी. रंगरंगोटी व्हावी.

मा.अध्यक्ष महोदया, आरोग्य खात्याविषयी प्रत्येक प्रश्न महत्वाचा आहे. ड्रेनेजवाले मिटींगला आले नसतील तर त्यांना नोटीस काढण्यात यावी. सदस्यांचा अपमान करता तुम्ही. सुलभ शौचालय आहे. त्यांना कडया कोयंडे नाही, टाईल्स नाही, स्वच्छता नाही, छप्पर वरुन गळत आहे, नागरिकांना दरवाजा धरुन शौचालयास बसावे लागत आहे. ही जबाबदारी कोणाची आहे. देखभाल करणे हे आपले काम आहे. ३ रुपये द्यायचे आणि संडासला कडया कोयंडे नाही. प्रत्येक प्रकरणाची चौकशी करण्यात यावी. ठेकेदाराला व्यवस्थित ठेवले पाहीजे. बाकीचे प्रश्न इतर विभागांचे आहेत.

मा.अध्यक्ष महोदया, माझी या ठिकाणी एक सूचना आहे. आपले महापालिकेचे कॅलेंडर आहे. आता तुम्हाला वाटते यांना याचे काय पडले आहे. परंतु प्रश्न महत्वाचा आहे. त्या कॅलेंडरच्या पहिल्या पानावर ठाणे महानगरपालिकेचे नाव आहे. पुढील उर्वरित पानांवर ठाणे महानगरपालिकेचे नाव नाही. ते असणे आवश्यक आहे. अशी माझी सुचना आहे. आपण प्रश्न उपस्थित करावा. आपल्याला डायऱ्या मिळाल्या. त्या कधी मिळाल्या आपल्याला. एक महिना होऊन गेल्यानंतर मिळाल्या. मी स्वत: महापालिकेची डायरी मिळेल, मिळेल याची वाट बघून थकून गेलो हा भाग वेगळा. माझे म्हणणे असे आहे की, डायरी ३० तारखेपूर्वी सन्मा.सदस्यांना मिळाली पाहीजे. याबाबत तत्परतेने कार्यवाही होईल अशी आशा करतो.

मा.अध्यक्ष महोदया, मी मघाशी अग्निशमन विभागाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.परदेशी :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अगदी योग्य आहे. आपल्याला फायर इंजिनची आवश्यकता आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण या ठिकाणी अग्निशमन विभागाच्या वतीने उत्तर देण्यासाठी आलेला आहात. काही ठिकाणी रस्त्यावर ऑईल पडलेले असते. त्या ठिकाणी दुचाकी वाहने टर्न मारतात. त्यावेळी दुचाकीवाले घसरुन पडतात. त्यावेळी अग्निशमनची मोठी गाडी यायला वेळ लागतो. याचा स्वत: मी अनुभव घेतो. छोटी गाडी घ्यावी अशी माझी सूचना आहे. मी सहा ते सात महिन्यांपूर्वी मांडलेली आहे.

श्री.परदेशी :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे ज्या मोठया गाडया आहेत त्या गल्लीबोळातून जाऊ शकत नाही.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, ज्या ठिकाणी मोठमोठे टॉवर आहेत त्या ठिकाणी फायर सिस्टिम लावली जाते. ती चालू असावी अशी आपली कंडीशन आहे. परंतु प्रत्यक्षात असे होते का. जर त्या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडला तर आपण काय करणार आहात.

श्री.परदेशी :-

मा.अध्यक्ष महोदया, अशा वेळी आपण मोठी गाडी घेऊन जात असतो.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, मोठया टॉवरमध्ये आग लागली तर सगळयांना लगेच हे कळत नाही. याचे कारण काय आहे ते म्हणजे ९० टक्के फायर सिस्टिम चालू नाहीत. आपण त्यांना नोटीसा बजावत नाही. तुमच्याकडून कारवाई होत नाही. बिल्डींगला नोटीस काढलेली नाही. कोणत्याही बिल्डींगमध्ये जाऊन पहा. आग लागल्यानंतर कारवाई करणार आहात का. कोणाची जबाबदारी आहे.

श्री.परदेशी :-

मा.अध्यक्ष महोदया, हे मी बघुन घेतो.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, याचे उत्तर लगेचच द्या.

श्री.परदेशी :-

मा.अध्यक्ष महोदया, पुढच्या मिटींगमध्ये मी उत्तर देतो.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत सोसायटीमधील व्यापारी गाळयांना आकारण्यात येणाऱ्या पाणी बिले रद्द करण्याबाबत ठराव करावयाचा आहे. बऱ्याच सोसायटयांमध्ये व्यापारी गाळे असून त्यामध्ये महापालिकेचे पाणी वापरण्यात येत नाही. तरी सुध्दा त्यांना पाण्याची बिले पाठविण्यात येतात. सोसायटीच्या नावाने पाण्याची बिले पाठवितात. त्याची बिले सोसायटी भरते. काही ठिकाणी बरीच थकबाकी आहे. जे महापालिकेचे पाणी वापरत नाहीत त्यांना बिले पाठविण्यात येऊ नयेत अशी सूचना मी करीत आहे.

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्या सौ.सुजाता पाटील यांनी जी सुचना केली आहे त्यास मी अनुमोदन देत आहे. हा महत्वाचा विषय आहे. तो मा.महासभेपुढे पाठविण्यात यावा.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीमध्ये ड्रेनेजचे काम चालू आहे. बऱ्याच ठिकाणी चालू आहे. २० फुट खोल खोदून काम चालू आहे. त्यावर देखरेख करणारी माणसे कोण आहेत. त्या ठिकाणी आपल्या अधिकाऱ्यांनी यायला हवे की नाही. पाण्याची लाईन फुटत असते. त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. प्लंबरने जागेवर यायला पाहीजे. लाखो लिटर पाणी वाया जात असते. हे जे काम चालू आहे ते आपण ४० वर्षानंतर करीत आहोत. ठाणे शहरात सगळयाच ठिकाणी होणार आहे. २० फुट लाईन टाकणार आहोत. रोडची लांबी किती असायला पाहीजे. बिल्डींग आहेत, टॉवर आहेत. ड्रेनेजची लाईन कुठल्या प्रकारे टाकणार आहोत. वागळे प्रभाग समितीमध्ये इमारती रोडलगतच आहेत. त्या ठिकाणी आपण लाईन टाकणार आहात का. नाशिक शहरामध्ये देखील हे काम चालू आहे. ठाण्यामध्ये असे का. काही प्रॉब्लेम झाला तर जबाबदारी कोणाची आहे. ठेकेदार पैसे घेऊन जातील. पालिकेचे पैसे वाया जाणार आहेत.

श्री.नितीन पवार (कार्यकारी अभियंता) :-

मा.अध्यक्ष महोदया, या ठिकाणी ड्रेनेज विभागाचे कोणी नाही. आपण जे सांगितले आहे ते त्यांच्यापर्यंत पोहचवितो.

सौ.स्मिता देशमुख :-

मा.अध्यक्ष महोदया, औषधांची फवारणी का होत नाही. तसेच नागरिकांच्या तक्रारी देखील वाढलेल्या आहेत.

श्री.चोपडे :-

मा.अध्यक्ष महोदया, आठवडयातून दोन वेळा धूर फवारणी व औषध फवारणी होत असते. जर काही ठिकाणी होत नसेल तर मी बघून घेतो. प्रत्यक्ष बघून घेतो.

सौ.स्मिता देशमुख :-

मा.अध्यक्ष महोदया, टेकडी बंगला, सरस्वती शाळेच्या येथे.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे अतिशय महत्वाचे आहेत. माझ्याकडे समाज विकास विभागाचा अतिरिक्त कार्यभार आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना समाज विकास विभागामार्फत घंटाळी मैदान येथे दि.१८-२-२००९ रोजी महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. सदर मेळाव्यामध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाची विक्री स्टॉलमधून केली जाणार आहे. बचत गटांना प्रोत्सान देण्याच्या दृष्टीने आपण सदर मेळाव्यास सदिच्छा भेट द्यावी, ही विनंती. सदर दिवशी दुपारी २ वाजता आयुक्त साहेब मार्गदर्शन करणार आहेत.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण समाज विकास विभागामार्फत विविध प्रकल्प राबवित आहात ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु यातून निष्पन्न काही होते का. की नुसते दाखविण्यासाठी असे प्रकल्प आपण राबविता.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, या महिला बचत गटामधील महिला अशिक्षित असतात. त्यांना मार्गदर्शन मिळावे. ते विशेष सल्लागारांनी करावे हाच हेतू असतो.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, हा गोरगरिब महिलांचा विषय आहे म्हणून आम्हाला तळमळ आहे. आम्ही धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या तालमीमध्ये घडलो आहोत. मला असे म्हणायचे आहे की, कार्यक्रम राबविताना ते वेगळे पणे राबवावेत. समाजाला त्याच्यापासून काही फायदा मिळणार आहे का याचा विचार करावा.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण स्वयंरोजगारासाठी अनुदान देत आहोत. आपण वेळात वेळ काढून मेळाव्यास भेट द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. आपण आपल्या प्रभागातील जास्तीत जास्त महिलांना याबाबतची माहिती द्यावी अशी देखील माझी विनंती आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, तुमच्या योजना चांगल्या आहेत. पण त्या लोकांपर्यंत पोहचत नाहीत. अशा योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. याबाबतच्या बातम्या वृत्तपत्रांमधून, केबल वाहिन्यांवरुन लोकांपर्यंत लवकर पोहचतात. प्रत्यक्षात त्या नागरिकांपर्यंत किती पोहचतात असे माझे म्हणणे आहे. त्यामुळे आपण काहीतरी ठोस उपाययोजना करा. त्याचा फायदा लोकांपर्यंत पोहचला पाहीजे यासाठी काम करा.

श्री.अशोक वैती :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. आपल्याकडे पुस्तक आहे. त्यामध्ये कोणत्या योजना आहेत त्या योजनेचा फायदा याबाबतची माहिती सन्मा.सदस्यांना देण्यात यावी. त्यामध्ये महापालिकेच्या पण योजना आहेत. त्यामध्ये शासनाच्या योजना आहेत. त्याचे देखील एकत्रित पुस्तक सन्मा.सदस्यांना देण्यात यावे. त्याचा निश्चितच फायदा होईल.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. आपल्याला त्याची एक झेरॉक्स कॉपी काढून देण्यात येईल.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, माहितीच्या अधिकारात कलम ४ आहे. ज्या अत्यावश्यक सुविधा आहेत त्यामध्ये पाणी पुरवठा आहे, विज पुरवठा आहे. त्याबाबतची यादी लावलेली नाही. त्याबाबत माहिती देण्यात यावी. याचे बोर्ड लावण्यात यावे.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी रास्त सूचना केलेली आहे. माहिती अपिलिय अधिकारी याबाबतचा तक्ता लावण्यात आलेला आहे.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, ड्रेनेजची गाडी मागविण्यासाठी फोन केला तर एक दिवसात येईल आणि पैसे दिले तर लगेचच येईल अशी परिस्थिती आहे. फुकट काहीच मिळत नाही.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आताच रस्त्यामधून येत असताना काही ठिकाणी एमएसईबी, एमजीएल, टेलिफोन, बांधकाम खाते, पाणी खाते यांचे खोदकाम चालू असल्याचे निदर्शनास आले. त्यासंदर्भात खोदण्यासाठी परवानगी देतात. अनेक ठिकाणी खोदकाम करतात. खोदून निघून जातात. एखादा शाळकरी मुलगा अथवा ज्येष्ठ नागरिक त्या ठिकाणी खड्डयात पडून अपघात होण्याची शक्यता असते.

खडडा खोदलेला आहे. त्यावर माती टाकली आहे की नाही हे माहिती नाही. त्याचेवर सुपरव्हिजन कोणाचेही नाही. आपण जाऊन बघावे. सरस्वती शाळेच्या येथे खडडा खोदलेला आहे तो बुजविला आहे का. माहितीच नाही. डब्ल्युबीएम वगैरे काहीही केलेले नाही. जाऊन बघा. उगाच जनतेला त्रास कशाला. आपले ठेकेदार बिले काढुन मोकळे होतात. खडडे परत उखडलेले असतात.

मा.अध्यक्ष महोदया, मी वारंवार या प्रभाग समितीमध्ये या संदर्भात चर्चा करीत आहे. वाहतूक कोंडीसंदर्भात प्रत्येक वेळेला सांगत असतो. तीन पेट्रोल पंप येथे आपण सीएनजी स्टेशनसाठी परवानगी दिलेली आहे. जवळजवळ १००० ते १५०० रिक्षांचा घेराव त्या ठिकाणी घातलेला असतो. चालण्यासाठी फुटपाथ नाही. गॅरेजवाले, स्पेअरपार्टवाले बिनधास्तपणे आपला व्यवसाय करीत आहेत. गाडयांचे डेकोरेशन करणारे देखील आहेत. सभागृहात चर्चा होऊन देखील कारवाई होत नसेल तर जबाबदारी कोणाची आहे. प्रत्येक वेळी प्रभाग समितीची मिटींग लागल्यानंतर आम्ही चर्चा करायची. चर्चा केल्यानंतर बाहेर उठून गेल्यावर फोन करणार. आज मिटींगमध्ये चर्चा झाली आहे. तुम्ही सामान बाजूला करा. आज सुध्दा हे होणार हे मी तुम्हाला सांगतो. तिथे गाडया लागल्या नाही पाहीजेत. रस्ते फुटपाथ मोकळे ठेवा.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांना सांगू इच्छितो की, आम्ही फुटपाथवर नियमितपणे कारवाई करीत आहोत.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण काय कारवाई केली याचा रिपोर्ट द्या मला.

श्री.महेश झगडे :-

मा.अध्यक्ष महोदया, गाडया तोडण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण जे जॅमर घेतलेले आहेत. ते आपण ट्रॅफिकवाल्यांना दिले आहेत. कशाला दिले आहेत, का दिले आहेत. प्रत्येक वेळेला जॅमर मागवून घ्या म्हणून सांगत आले. ते आपण करत नाही. ते करण्यात यावे. स्पेअर पार्टवाले, गॅरेजवाले फुटपाथवर काम करीत आहेत. नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ राहिलेला नाही. ठेकेदाराचे मटेरियल रस्त्यावर, रॅबिट रस्त्यावर, खोदकाम झ ााल्यावर नागरिक मा.महापौरांकडे मोर्चा घेऊन जातात. फुटपाथवर जी चेंबर्स आहेत त्याची झाकणे आहेत का जागेवर. आपले कनिष्ठ अभियंता दिवसातून किती वेळा कुठेकुठे राऊंड मारतात याची चौकशी करता का आपण. हे आम्हाला दाखवून द्या. आमचे जेई फक्त ऑफिसमध्ये बसून ठेकेदारांच्या फाईल्स बनवत असतात. किती खर्च येईल. किती वाढवून खर्च येईल. याची देखील मागच्या सभेमध्ये चर्चा केली होती. पाणी खात्याचे पण जेई कोठे आहेत. कचऱ्या संदर्भात साफसफाई संदर्भात मागच्या वेळेस आपले उपनगर अभियंता सामंत स ाहेब यांना संगितले होते की, आपले जेई दिवसातून काय काम करतात. मी मागच्या वेळेला तक्रार केली की झाकणे गेलेली आहेत तेंव्हा त्यांना जाग आली. बनवायला पाठविली आहेत. १५ दिवसात येतील. एवढी झाकणे बसवितो आपण. जाळया कुठे जातात. त्याचे मला समजत नाही. आपण वृक्षारोपण दरवर्षी करतो. महत्वाचे म्हणजे आपले जेई प्रत्येक वॉर्डामध्ये फिरला पाहीजे. सकाळी, दुपारी संध्याकाळी. झाकणे नाहीत, खडडे पडले आहेत. याबाबत दक्षता त्यांनी घ्यावी.

मा.सहाय्यक आयुक्त :-

मा.अध्यक्ष महोदया, अतिक्रमण संदर्भात माझ्याकडे तक्ता आहे. जानेवारी २००९ मध्ये आपण ३५ हातगाडया १०० टोपल्या, ठेले, १० वाहने टो केली आणि रिमुव्हल चार्जेस पोटी ७५ हजार वसूली आपण केली आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आताच सन्मा.सहाय्यक आयुक्त साहेबांनी स्टेशनवर ज्या प्रमाणे अनाऊंसमेंट होते त्याप्रमाणे त्यांनी त्यांची कामगिरी वाचून दाखविली. मी जे मुददे उपस्थित केले आहेत ते वेगळेच आहेत. आणि हे वेगळेच काहीतरी सांगत आहेत. माझ्या प्रभागात ५ ते १० हजार रिक्षांचा घेराव घातलेला असतो. शाळा आहे, हॉस्पिटल आहे, सिनेमागृह आहे. अशा ठिकाणी हे गाडया पार्किंग करुन काम करत असतील तर तुम्ही त्यांच्यावर काय कारवाई केली ते सांगा मला.

मा.सहाय्यक आयुक्त :-
मा.अध्यक्ष महोदया, त्याबाबतची माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रकाश पायरे :-
मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी केलेली सूचना अतिशय महत्वाची आहे. तीन पेट्रोल पंप येथे सुमारे २ कि.मी. पर्यंत रिक्षांचा गराडा पडलेला असतो.

श्री.नारायण पवार :-
मा.अध्यक्ष महोदया, पण त्यासाठी काही नियम वगैरे आहेत की नाहीत.

श्री.प्रकाश पायरे :-
मा.अध्यक्ष महोदया, केन्द्रात व राज्यात सरकार तुमचेच आहे. तुम्ही त्यांना सांगा. महाराष्ट्र शासनाने अॅलॉटमेंट केलेले आहे. ते कॅन्सल करु शकतात.

श्री.नारायण पवार :-
मा.अध्यक्ष महोदया, पण एनओसी तर महापालिकेने दिली आहे ना. त्यांचे काय एनओसी देऊन मोकळे होतात.

श्री.प्रकाश पायरे :-
मा.अध्यक्ष महोदया, असे असेल तर आपण आज या ठिकाणी ठराव करु या की, सदरचे सीएनजी स्टेशनचा परवाना रदद करण्यात यावा.

श्री.पुंडलिक थोरवे :-
मा.अध्यक्ष महोदया, हे काम आपल्याकडून होणार नाही. मी पाच वर्षापासून सांगत आहे. आपली मूदत संपली तरी हे काम होणार नाही. नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून प्रयत्न करावे. सन्मा.सदस्य पवार साहेबांनी मुददा उपस्थित केला होता की, वंदना सिनेमापासुन हरिनिवासपर्यंत गॅरेजवाले आहेत त्यांचा आपण काय बंदोबस्त करीत आहोत. शाळेत जाणारी मुले आहेत.

श्री.नारायण पवार :-
मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी किती रिक्षा उभ्या असतात आपण हे तपासून पहा. आपले अधिकारी हूशार आहेत. एखाद्या बिल्डरला एनओसी द्यायची असेल तर माझे काय असा प्रश्न निर्माण होतो. गाडया उभ्या राहतात त्याचे उत्तर मला द्या. आता उचलणार की उद्या. कारवाई सतत आठवडाभर सरु ठेवा. नागरिक आम्हाला विचारतात, नगरसेवक झोपले आहेत काय.

मा.प्रभाग अधिकारी :-
मा.अध्यक्ष महोदया, तीन पेट्रोल पंप येथे एक आठवडा करवाई सुरु राहील.

श्री.पुंडलिक थोरवे :-
मा.अध्यक्ष महोदया, माझी यासंदर्भात एक सूचना आहे की, त्या ठिकाणी एक गार्ड तैनात ठेवा. त्याने गाडी उभी दिसली की, लगेचच त्याला हाकलून द्यायला सांगा. दोन चार दिवस आपल्याला तसे करता यईल.

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, सुरक्षा विभागास सूचना देण्यात येतील. गटारांवरील झाकणांबाबत आपल्याला गुन्हे दाखल करता येतील. आपल्या तसे निदर्शनास आल्यास आम्हाला तसे सांगितल्यावर आम्हाला गुन्हे दाखल करता येतील.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या येथे पहिल्यांदा आरसीसी झाकणे लावायचो आपण. त्यानंतर त्यांची चोरी सुरु झाल्यानंतर आपण एसएफआरसीची झाकणे बसवण्यास सुरुवात केलेली आहे.या झ ाकणांच्या चोरीचे् प्रमाण कमी आहे. आपला जेई हा जातच असतो.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, मग आम्ही कशाला तक्रार करतो. आमच्या दरवाजासमोरची झाकणे गेली कुठे. हे लोक आमच्या घरी येतात. आमच्या घरासमोरची झाकणे नाही. कशाला तक्रार करायची.

श्री.प्रकाश पायरे :-

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या गटारांवरील झाकणांची साईज एकच असावी अशी माझी सूचना आहे. १ x २ १/२ अशी साईज एकच ठेवावी. कशासाठी आम्ही बोलत आहोा. मी करीत असलेली सूचना अंमलात यावी.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आताच आपले कार्यकारी अभियंता पवार साहेबांनी सांगितले की, आपले जेई फिरतात. तर मग आम्ही तक्रार कशाला करतो. वारंवार राणेंना सांगतोय.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, ते वॉर्डमध्ये साईटवर आहेत.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, राणे एकच जेई आपल्याकडे आहेत का.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे पाणी खात्याचे देखील काम चालू आहे. सरस्वती शाळेच्या येथे.

सौ.सुजाता पाटील :-

मा.अध्यक्ष महोदया, रामवाडी दत्तमंदिर येथे.......

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्य श्री.थोरवे साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाचा मी खुलासा करीत आहे. एमएसईबीची केबल आपल्या पाईपलाईनला लागून टच झालेली आहे. संबंधित विभाागाला मी फोन केला होता. ती केबल आपण स्वत: बाजूला करुन घेऊ या.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पाईपलाईनला टेकूनच जमिनीपासुन ६ फुट उंच आलेली आहे.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपली सूचना बरोबर आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, आपण रस्ते बनवले. सरस्वती शाळेच्या बाजूला खोदकाम केले होते. तो पूर्ण रस्ता उखडलेला आहे. एवढे लाखो रुपये आपण त्या रस्त्यावर खर्च केले आहेत. सन्मा.सदस्या सौ.देशमुख ताई यांच्या प्रभागातील रस्ता आहे. लोळगे डॉक्टरांच्या येथील.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, पाणी खात्याकडून खोदाई झालेली आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, लोक आम्हाला विचारतात. आताच रस्ता बनवला आहे त्याची स्थिती ही आहे. फक्त दोन तीन महिने झाले आहेत. त्या रस्त्याची स्थिती काय आहे.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, लाला साहेबांबरोबर याबाबत बोलणे झाले आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, रस्त्यांचा गॅरंटी पिरियड बघा. अशी स्थिती आपली आहे.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, पाण्याची लाईन टाकण्यात आल्यामुळे शेप बदलला आहे.

श्री.नारायण पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, जे काही आपण काम केले आहे त्याची दक्षता आपण घेतली पाहीजे. त्या ठिकाणाहून ड्रेनेज लाईन जाणार आहे. याची दक्षता आपण घेतली पाहीजे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, काही ठिकाणी महानगर गॅसच्या लोकांचे काम चालू आहे. त्या ठिकाणी आपल्या जेईंनी कशा पध्दतीने काम सुरु आहे हे पाहिले पाहीजे. परवानगी घेतली आहे का, ती व्हॅलिड आहे का याची चाचपणी करावी.

श्री.नितीन पवार :-

मा.अध्यक्ष महोदया, याबाबत दक्षता घेण्यात येईल. पेव्हर ब्लॉक बसविणेसाठीचा प्रस्ताव बनविलेला आहे. तो मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे. प्रभागातील पुतळयांचे मेन्टेनेन्सचे टेंडर प्रस्तावित केलेले आहे. रेग्युलर साफसफाई होणार आहे. धर्मवीर आनंद दिघे टॉवरची साफसफाई, रंगरंगोटी व इतर कामे करण्यात येणार आहेत.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, धर्मवीर टॉवरचा परिसर आपण सर्कसवाल्यांना भाडयाने देणे योग्य वाटते का तुम्हाला. गार्डन चांगल्या प्रकारे करावे. हिरवळ टाकून तयार करावी. सायंकाळच्या वेळेस ज्येष्ठ नागरिकांना मन प्रसन्न झाल्यासारखे वाटले पाहीजे. साहेबांची स्मृती आहे. ती आयुष्यभर जतन राहील. बाकी आपण विचार करावा.

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, याबाबतचा प्रस्ताव स्थायी समित व महासभेपुढे आहे.

( प्रकरण क्रमांक १०५ वाचून दाखवितात )

प्रकरण क्रमांक १०५ मंजूर........

( प्रकरण क्रमांक १०६ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक १०६ मंजूर........

( प्रकरण क्रमांक १०७ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक १०७ मंजूर........

( प्रकरण क्रमांक १०८ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक १०८ मंजूर........

( प्रकरण क्रमांक १०९ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक १०९ मंजूर........

( प्रकरण क्रमांक ११० वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक ११० मंजूर........

( प्रकरण क्रमांक १११ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक १११ मंजूर........



( प्रकरण क्रमांक ११२ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक ११२ मंजूर........

( प्रकरण क्रमांक ११३ वाचून दाखवितात )
प्रकरण क्रमांक ११३ मंजूर........

मा.प्रभाग अधिकारी :-

मा.अध्यक्ष महोदया, आजच्या सभेपुढे आयत्यावेळचे विषय मंजूरीसाठी आलेले आहेत. ते मी वाचून दाखवितो.

( आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११४ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११४ मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११५ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११५ मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११६ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११६ मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११७ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११७ मंजूर........

( प्रकरण क्रमांक ११८ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११८ मंजूर........

( प्रकरण क्रमांक ११९ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक ११९ मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२० वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२० मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२१ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२१ मंजूर........

(आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२२ वाचून दाखवितात )
आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १२२ मंजूर........

डॉ.वाघचौरे :-

मा.अध्यक्ष महोदया, ३ रुग्णवाहिका व १ स्वतंत्र वाहन घेणेबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे. बजेटची व्यवस्था झालेली आहे. मुख्य स्मशानभूमीमध्ये एक रुग्णवाहिका ठेवावी.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, हा स्पष्ट विषय आहे. तो उपस्थित के ला जातोय. माझ्या माहितीप्रमाण तो प्रथमच मांडतोय. एखाद्या ठिकाणी अपघात घडला. असे होऊ नये. पण जर असे घडले तर कोपरी, व ागळे, बाळकूमवरुन रुग्णवाहिका येऊ शकेल. ती यायला २५ ते ३० मि िनटे ल ागतील. ड्रायव्हर जेवायला गेला आहे, कोण बोलतय यामध्ये वेळ जाईल. त्यच्यानंतर २० ते २५ मिनिटांनी ते पोहचतील. नौपाडा प्रभाग समितीची हदद कोपरी ब्रिज ते नितीन कंपनीपर्यंत आहे. रुग्णवाहिकेची आवशकता आहे पण ती मिळत नाही. आम्ही तुमच्यावर आरोप करु का. सिव्हिल हॉस्पिटलच्या येथे गाडया आहेत. नौपाडा प्रभागसमितीची रुग्णवाहिका बाहेर पाठविली आहे. एक कोपरीला पाठवली,एक वागळेला तर एक बाळकूमला पाठवली आहे. येथे का एकही रुग्णवाहिका ठेवली. विचार करुन उत्तर द्या. वाघचौरे यांना भोगे यांनी विचारणा केली तर स्मशानभूमीमध्ये गेलेली आहे असे सांगितले. लोकांना सर्व माहिती आहे. त्यांनी सुचना केली. तुम्ही चूकीची उत्तरे सभागृहात देऊ नका. सगळे अनुभवी सभासद बसलेले आहेत. तुमची जबाबदारी आहे.

डॉ.वाघचौरे :-

मा.अध्यक्ष महोदया, या बजेटमध्ये आपण तरतूद केलेली आहे.

श्री.पुंडलिक थोरवे :-

मा.अध्यक्ष महोदया, बजेट वाढवून दिले होते. ३ रुग्णवाहिका व ३ स्वतंत्र वाहने या बजेटमध्ये येणार आहेत.

श्री.मुकूंद जाधव :-

मा.अध्यक्ष महोदया, आपल्या प्रभाग समितीमधील लॅब परत आणणार होतात त्याचे काय झ ाले.

डॉ.वाघचौरे :-

मा.अध्यक्ष महोदया, ब्लड कलेक्शनसाठी माणसे ठेवलेली आहेत.

श्री.मुकूंद जाधव :-

मा.अध्यक्ष महोदया, मलेरिया डिटेक्शनसाठी आपल्याकडे लॅब होती ती कशी काय हलविली.

डॉ.वाघचौरे :-

मा.अध्यक्ष महोदया, पुढच्या मिटींगपर्यंत स्वतंत्र लॅब सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

=*=*=*=*=

प्रकरण क्र.१०५ ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.८-१२-२००८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१०६     दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.८-१२-२००८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील     अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र.१०६ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६५ मध्ये शिवाजीनगर, बी केबिन येथे नवीन सेमी हायमास्ट मेटल हॅलाईड फिटींग बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१०७ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्रे व कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६५ मध्ये नगरसेवक निधीमधून शिवाजीनगर, बी केबिन येथे नवीन सेमी हायमास्ट मेटल हॅलाईड फिटींग बसविणेकामी होणाऱ्या रक्कम रु.४९,९१७/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास हजार नऊशे सतरा मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (अ) अन्वये सदरचे काम दरपत्रके मागवून करुन घेणेस ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरसेवक निधी लेखाशिर्षकांतर्गत आर्थिक तरतूदीमधून करण्यात येईल.

प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.१०७ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये श्री साईबाबा मंदिरजवळ डेकोरेटिव्ह पोल बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१०८ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी कागदपत्रे व कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये प्रभाग सुधारणा निधीमधून श्री साईबाबा मंदिरजवळ डेकोरेटिव्ह पोल बसविणेकामी होणाऱ्या रक्कम रु.४७,६१८/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तेचाळीस हजार सहाशे अठरा मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (अ) अन्वये सदरचे काम दरपत्रके मागवून करुन घेणेस ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदर कामाचा खर्च प्रभाग सुधारणा निधी लेखाशिर्षकांतर्गत आर्थिक तरतूदीमधून करण्यात येईल.

प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रकरण क्र.१०८ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६४ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत घंटाळी मैदान येथील कंपाऊंड वॉल रंगरंगोटी करणे, मुरुम टाकणे इ. कामे करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१०९ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६४ मधील सन्मा.सदस्य श्री.विलास शिवराम सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,७३,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सा़े. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,७३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष त्र्याहत्तर हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील　　　　　　　　अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.१०९　　नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६९ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत काजूवाडी येथील पतिराम यादव चाळीजवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११०　　दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,८४,७५०/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सा़े. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून नियमाप्रमाणे जाहीर निविदा मागवून मंजूर लघुत्तम निविदाकारामार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च

रु.१,८४,७५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष त्र्याऐंशी हजार सातशे पन्नास मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११० नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत विविध ठिकाणी एफआरपी बेंचेस बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१११ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,८९,६००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून नियमाप्रमाणे जाहीर निविदा मागवून मंजूर लघुत्तम निविदाकारामार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,८९,६००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणनव्वद हजार सहाशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.१११ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६३ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत कचराळी तलाव परिसरामधील श्री गणपती मंदिर सभोवतील लाद्यांचे नूतनीकरण करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११२ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६३ मधील सन्मा.सदस्य श्री.नारायण शंकर पवार यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,९९,८९३/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून नियमाप्रमाणे जाहीर निविदा मागवून मंजूर लघुत्तम निविदाकारामार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,९९,८९३/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्व्याण्णव हजार आठशे त्र्याण्णव मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११२ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६७ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत ओपन हाऊस ते मोनालिसा अपार्टमेंटपर्यंत रस्त्याच्या साईडचे फुटपाथचे नूतनीकरण करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११३ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६७ मधील सन्मा.सदस्या सौ.अनिता हिराकांत फर्डे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,९९,४००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून नियमाप्रमाणे जाहीर निविदा मागवून मंजूर लघुत्तम निविदाकारामार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,९९,४००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्व्याण्णव हजार चारशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११३ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६६ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत श्री.खाणेकर यांच्या घरासमोरील जुने गटार तोडून पुनर्बांधणी करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११४ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६६ मधील सन्मा.सदस्या सौ.सुजाता भास्कर पाटील यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.५६,३००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून नियमाप्रमाणे जाहीर निविदा मागवून मंजूर लघुत्तम निविदाकारामार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.५६,३००/- (अक्षरी रक्कम रुपये छप्पन्न हजार तीनशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११४ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत कोळीवाडा येथील नारायण स्मृती ते मानकामे इमारतीपर्यंत सीसी पेव्हर्स बसविणे

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११५ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.५९ मधील सन्मा.सदस्या सौ.शांता शामजी सोलंकी यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,११,७००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,११,७००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अकरा हजार सातशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११५ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६५ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत गणेश कृपा ते अरिहंत टॉवर्स रस्त्याचे साईडपट्टीवर पीसीसी करणे, झाकणे बसविणे इ. स्थापत्य कामे करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११६ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६५ मधील सन्मा.सदस्य श्री.संजय संतु वाघुले यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,६१,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,६१,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकसष्ठ हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

प्रकरण क्र.११६ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत गुजराथी बालवाडीजवळील सार्वजनिक शौचालयाचे नूतनीकरण करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११७ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.५९ मधील सन्मा.सदस्या सौ.शांता शामजी सोलंकी यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.६६,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.६६,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सहासष्ठ हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी<br>
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=

आयत्यावेळचे नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये प्रभाग सुधारणा निधी प्रकरण क्र.११७ अंतर्गत जय-जवान मार्केट, प्रभात टॉकीज शेजारी गल्लीत पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११८ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेचे मा.स्विकृत सदस्य श्री.अनिल गजानन सावे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,९५,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,९५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष पंच्याण्णव हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी<br>
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=

आयत्यावेळचे प्रकरण क्र.११८ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६२ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत महर्षी कर्वे रस्ता येथे झाकणे बसविणे, हॉटेल कोल्हापूर येथील पदपथावर पेव्हर ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य कामे करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११९ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६२ मधील सन्मा.सदस्या सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,९५,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,९५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष पंच्याण्णव हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

आयत्यावेळचे प्रकरण क्र.११९ — नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६४ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत गडकरी पथ येथील गणपती कारखान्यासमोरील गटार, पदपथ बांधणे, वीर सावरकर पथ व घंटाळी पथ जंक्शनवर डिव्हायडर बसविणे इ. कामे करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२० दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६४ मधील सन्मा.सदस्य श्री.विलास शिवराम सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,९९,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्व्याण्णव हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

आयत्यावेळचे प्रकरण क्र.१२० — नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत जिजामातानगर येथील ओमसाई चाळीजवळ गटार बांधणे व श्री गणेश चाळीजवळ कॉंक्रिटीकरण करणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२१ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,१०,४००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,१०,४००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष दहा हजार चारशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

आयत्यावेळचे
प्रकरण क्र.१२१ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत स्व.निर्मलादेवी दिघे मार्गावरील ईएसआयएस ब्रिज श्रीनिवास सोसायटी जवळ नागरिकांच्या जाण्या-येण्यासाठी पायऱ्या बांधणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२२ दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,४९,८००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त साो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,४९,८००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणपन्नास हजार आठशे मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

आयत्यावेळचे
प्रकरण क्र.१२२ नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.६९ मध्ये नगरसेवक निधी अंतर्गत जिजामातानगर येथील हनुमान मंदिरजवळील परिसरात लाद्या बसविणेबाबत.

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२३     दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारसीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक बारकू वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजेखर्च रु.१,७९,०००/- इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या मजूर कामगार सहकारी संस्थेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजेखर्च रु.१,७९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणऐंशी हजार मात्र) ला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ "अ" अन्वये ही समिती प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचक :- सौ.अनिता फर्डे                अनुमोदक :- सौ.सुहासिनी लोखंडे

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

=*=*=*=*=*=

## चर्चेच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेला ठराव

मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२४     दिनांक : १७-२-२००९

ठ रा व :-

प्रकरणी चर्चा करता, नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत बऱ्याच सोसायटया असून बऱ्याच सोसायटयांमधून व्यापारी गाळे असून त्यामधील दुकानदार महापालिकेचे पाणी वापरत नाहीत. परंतु त्यांना पाण्याची बिले पाठविली जातात. दुकानदार पाणी वापरत नसल्याने ते सोसायटीत पाण्याचे बिल देत नाहीत. परंतु महापालिका सोसायटीच्या नावाने बिले पाठविते. त्यामुळे सोसायटीमध्ये जे सभासद राहत आहेत त्यांची बिले सोसायटी भरते व व्यापारी गाळे दुकानदार पाणी अजिबात वापरत नसल्याने पाण्याचे बिल देत नाहीत. त्यामुळे महापालिकेची थकबाकी वाढत आहे. त्यामुळे त्यांना पाण्याची बिले पाठवू नयेत. जे दुकानदार पाणी वापरत आहेत त्यांनी स्वतंत्र कनेक्शन घेतली आहेत. ते बिले भरत आहेत. त्यामुळे नौपाडा प्रभाग समितीमधील सोसायटीमधील व्यापारी गाळयांना आकारण्यात येणाऱ्या पाणी बिले रद्द करणेच्या प्रस्तावास ही समिती मंजूरी देत आहे.

सदरहू ठराव मा.महासभेपुढे मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील                अनुमोदक :- श्री.अशोक वैती

सर्वानुमते मंजूर......

सही/-सौ.शांता सोलंकी
अध्यक्ष-नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

(तद्नंतर मा.अध्यक्ष महोदया सायंकाळी ५.४० वा. संपल्याचे जाहीर करतात)

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

सभा संपल्याची वेळ सायंकाळी ५.४० वाजता.
दिनांक १७-२-२००९.
सचिव विभाग,
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रभाग अधिकारी
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

## अध्यक्ष, नौपाडा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे

## निवडणूक निकाल पत्र

राज्य शासनाने १७ फेब्रुवारी २००७ रोजी अधिसूचनेतील नियम ६(६) अन्वये, नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणूकीत नौपाडा प्रभाग समिती 'अध्यक्ष' पदासाठी नौ.अनिता हिराकांत फर्डे ह्यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केलेले आहे.

एकच उमेदवार असल्याने व एकच पद असल्याने सौ.अनिता हिराकांत फर्डे हे सन २००९-२० या एक वर्षाचे कालावधीसाठी बिनविरोध अध्यक्ष, नौपाडा प्रभाग समितीपदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पिठासीन अधिकारी
तथा
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग,
नौपाडा प्रभाग समिती सभा

(ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष सौ.अनिता हि.फर्डे ह्या अध्यक्षपदी आसनस्थ होतात. तद्नंतर सर्व सन्मा.सदस्य, सन्मा पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधू तसेच मान्यवर यांचेकडून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यांत येते.)

तद्नंतर सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

पिठासीन अधिकारी
तथा
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग,
नौपाडा प्रभाग समिती सभा

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय
दि.०४.०४.२००९

नौपाडा प्रभाग समिती विशेष सभा
सभा सकूचना क्र.०१, दि.२६.०३.२००९
सभा क्र.०१, दि.०४.०४.२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार, दि.४ एप्रिल २००९ रोजी दुपारी १२.५० वा. महापालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहे आंबेडकर सभागृह, दुसरा मजला येथे सभा सूचना क्र.०१, दि.२६.०३.२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात करण्यात आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र | नाव |
|---|---|
| १ | सौ.शांता शामजी सोलंकी |
| २ | श्री.महदीप (मुन्ना) बिष्ट |
| ३ | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे |
| ४ | श्री.नारायण शंकर पवार |
| ५ | श्री.विलास शिवराम सामंत |
| ६ | श्री.संजय संतू वाघुले |
| ७ | सौ.सुजाता भास्कर पाटील |
| ८ | सौ.अनिता हिराकांत फर्डे |
| ९ | सौ.स्मिता मधुकर देशमुख |
| १० | श्री.अशोक बारकू वैती |

(छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतात. तद्नंतर 'वंदे मातरम्' या गीताने सभेस सुरूवात होते.)

मा.सचिव विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र.०१ वाचून दाखवितात.

प्रकरण क्र.१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९ पोटकलम (अ) (४) अन्वये, सन २००९-२०१० करीता मा.नौपाडा प्रभाग समितीवर आसणाऱ्या एका सदस्याची ''अध्यक्ष '' प्रभाग समिती या पदावर नेमणूक करणेबाबत.

मा.सचिव अध्यक्ष, नौपाडा प्रभाग समितीमधील सदस्यांची नांवे सभागृहात वाचून दाखवितात.

| अ.क्र | नाव |
|---|---|
| १ | सौ.शांता शामजी सोलंकी |
| २ | श्री.महदीप (मुन्ना) बिष्ट |
| ३ | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे |
| ४ | श्री.नारायण शंकर पवार |
| ५ | श्री.विलास शिवराम सामंत |
| ६ | श्री.संजय संतू वाघुले |
| ७ | सौ.सुजाता भास्कर पाटील |
| ८ | सौ.अनिता हिराकांत फर्डे |
| ९ | सौ.स्मिता मधुकर देशमुख |
| १० | श्री.अशोक बारकू वैती |

मा.महापालिका सचिव :

मा.महोदय, दि.३१ मार्च २००९ रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची तारीख निश्चित करण्यात आली होती. सदर दिवशी महापालिका सचिव ह्यांचेकडे विहीत तारखेस एका सदस्याचे नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले आहे, ते पुढील प्रमाणे.

१. सौ.अनिता हिराकांत फर्डे

श्री.पाटील, अतिरिक्त आयुक्त (कोकण विभाग) :-

मा.विभागीय आयुक्त ह्यांचे मी श्री.सुबराव पाटील अतिरिक्त आयुक्त (कोकण विभाग) ठामपाच्या नऊ प्रभाग समितीच्या अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित आहे. सर्व प्रभाग समितीच्या सन्मा. सदस्यांचे प्रथम मी स्वागत करतो. नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी एक नामनिर्देशपत्र प्राप्त झालेले असून, ते वैध आहे.

सबब, नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदाकरीत सौ.अनिता हि.फर्डे ह्यांचे एकच नामनिर्देशनपत्र दाखल झालेले असल्याने या प्रभाग समितीकरीता बिनविरोध निवडणूक होत आहे.

<u>अध्यक्ष, नौपाडा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे</u>
निवडणूक निकाल पत्र

राज्य शासनाने १७ फेब्रुवारी २००७ रोजी अधिसूचनेतील नियम ६(६) अन्वये, नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणूकीत नौपाडा प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी सौ.अनिता हि.फर्डे ह्यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केलेले आहे.

एकच उमेदवार असल्याने व एकच पद असल्याने सौ.अनिता हि.फर्डे हे सन २००९-१० या एक वर्षाचे कालावधीसाठी बिनविरोध अध्यक्ष, नौपाडा प्रभाग समिती पदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पिठासीन अधिकारी
तथा
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग,
नौपाडा प्रभाग समिती सभा

(ठाणे महापालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सौ.अनिता हि.फर्डे हे अध्यक्षपदी आसनस्थ होतात. तद्नंतर सर्व सन्मा.सदस्य, सन्मा.पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकारबंधू तसेच मान्यवर यांचेकडून त्यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात येते.)

तद्नंतर सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

पिठासीन अधिकारी
तथा
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग,
नौपाडा प्रभाग समिती सभा

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

नौपाडा प्रभाग समिती कार्यालय,
दिनांक :- २२.०७.२००९

## मा.नौपाडा प्रभाग समिती सभा

सभा सूचना क्र.३, दिनांक :- २२.०७.२००९
सभा क्र.१, दिनांक :- २९.०७.२००९

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती ______________________
सदस्य / सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा **बुधवार, दि.२९.०७.२००९** रोजी **दुपारी ०४.०० वा.** मा.नौपाडा प्रभाग समिती कार्यालय येथील ''**कै.मो.दा.जोशी सभागृह**'' येथे सभा **सूचना क्र.३, दि. २२.०७.२००९** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचारविनियम करण्यांसाठी आयोजित करण्यांत येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित राहावे, हि विनंती.

**(राजेंद्र फणसे)**
प्रभाग अधिकारी / सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## सभा सूचना क्र.०३. दिनांक :- २२.०७.२००९ ची विषयपत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १४. | ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.२४.०६.०९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करण्याबाबत. |
| १५. | नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.६७ मध्ये, ओपन हाऊस नाका येथे सेमी हायमास्ट बसविणेबाबत. |
| १६. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत सर्व्हीस रोड, लँडमार्क सोसा.पासुन सुर्यदर्शन सोसा.पर्यंत ८०-५० वितरण वाहीनी टाकणेबाबत. |
| १७. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६५ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत सहकार कॉलनी येथील साईड पट्टीकरीता पी.सी.सी. करणे, कव्हर्स बसविणे इत्यादी स्थापत्य कामे करणेबाबत. |
| १८. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत काका सोहनी पथावर नवीन मलवाहीनी टाकणेबाबत. |
| १९. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत सरोवर दर्शन सोसा., पंकज सोसा. ते अल्मेडा रोडपर्यंत मलवाहिनी टाकणेबाबत. |
| २०. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत टेकडी बंगला परिसरातील गारडे चाळ, पायरे चाळ येथे गटार बांधणे व सी.सी.पेव्हर्स बसविणेबाबत. |
| २१. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत टेकडी बंगला विभागातील गोटल चाळ, पवार चाळ येथे गटार बांधणे व सी.सी. पेव्हर्स बसविणेबाबत. |
| २२. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत एल.बी.एस.रस्ता व मदनलाल धिंग्रा मार्ग जंक्शन कॉर्नरला (जूने आराधना टॉकीजसमोर) फुटपाथ नुतनीकरण करणेबाबत. |
| २३. | नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत टेकडी बंगला येथील अंबिका टॉवर ते पाणी टाकी येथे सी.सी.पेव्हर लावणेबाबत. |

२४. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत अल्मेडा रोड मंदार सोसा.समोरील फुटपाथचे नुतनीकरण करणेबाबत.

२५. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत शिवनेरी हॉस्पीटल जवळील बागेचे सुशोभिकरण करणेबाबत.

२६. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत लाजरस रस्ता येथे रूपी बँक ते अल्मेडा जंक्शनपर्यंत फुटपाथचे नुतनीकरण करणेबाबत.

२७. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६३ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत दगडी शाळा येथील मिरिंडा हाऊस परिसरात सी.सी.पेव्हर्स बसविणेबाबत.

२८. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत म.फुले रोड येथील समर्थ मेडीकल भंडार ते स्वरूपा टेडर्स दुकानपर्यंत पदपथाचे नुतनीकरण करणेबाबत.

२९. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत गडकरी पथ येथील गणपती कारखना ते शुभज्योत सोसा.पर्यंत पदपथाचे नुतनीकरण करणेबाबत.

३०. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत म.फुले रोड येथील वुडलँड दुकान ते दुपट्टा घर दुकानपर्यंत पदपथाचे नुतनीकरण करणेबाबत.

३१. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६६ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत स्वामी विवेकानंद मार्ग येथे फुटपाथ बनविणेबाबत.

३२. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६६ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत पुष्पक सोसा. ते सुचेता सोसा.पर्यंत गटार व पदपथ बनविणेबाबत.

३३. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६६ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत चिखलवाडी येथे बाबु माने नितीन खाणेकर यांच्या घरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे.

३४. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६६ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत चिखलवाडी येथे नाल्याचे राजू चोरगे यांच्या घरासमोर लोखंडी रेलिंग बनविणेबाबत.

३५. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६६ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत रामवाडी येथे दत्त मंदिरासमोरील पेव्हर ब्लॉक बसविणे व गणेश भुवन येथे पायवाट करणेबाबत.

३६. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६७ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत सर्व्हीस रोड येथील नटराज सोसा. ते वेफर्स फॅक्टरीपर्यंत सी.सी.पाईपद्वारे गटार बांधणेबाबत.

३७. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६७ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत मामू पठाण चाळ येथे गटार बांधणे व सी.सी.पेव्हर्सद्वारे पायवाट करणेबाबत.

३८. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६७ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत गुरूराणी नागकन्या मार्ग येथे नटराज सोसा.समोरील गटार सी.सी.पाईपद्वारे करणेबाबत.

३९. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.५९ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत खारटन रोड येथील शिव-आनंद सोसा.ते शशी जनरल स्टोर्सपर्यंत गटार बनविणेबाबत.

४०. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत खारटन रोड येथील डॉ.रंजलकर ते साईमंदिरपर्यंत गटार बनविणेबाबत.

४१. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.५९ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत खारटन रोड येथील शिव-आनंद सोसा. ते शशी जनरल स्टोर्स व शितलामाता चौक ते स्वागतम फॅशन कॉर्नरपर्यंत फुटपाथ नुतनीकरण करणेबाबत.

४२. नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६० मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत दादोजी कोंडदेव स्टेडीयमच्या मागील बाजुकडील गेट ते सार्व.शौचालयापर्यंत गटारावर स्लॅब टाकणेबाबत.

४३. नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६७ मध्ये, भक्ती मंदिर मार्ग नाका येथे सेमी हायमास्ट बसविणेबाबत.

**(राजेंद्र फणसे)**
प्रभाग अधिकारी/सचिव,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सचिव कार्यालय,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २२.०७.२००९

## मा.अध्यक्ष महोदया यांच्या पूर्व परवानगीने घेण्यांत येणारे विषय

४४ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६० मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत महागिरी येथे विमला मोटर्सच्या मागील परिसरात पेव्हर ब्लॉकचे काम करणेबाबत.

४५ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत सिडको बसस्टॉप जवळील बालाजी फुडस ते माणिक अपार्टमेंटपर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत.

४६ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत विविध ठिकाणी एफ.आर.पी.कुंडया बसविणेबाबत.

४७ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत भंडारआळी येथील मैदानात गेट बसविणेबाबत.

४८ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत वासंती अपार्टमेंट ते हनुमान मंदिरापर्यंत मल वाहिनी टाकणे व पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत.

४९ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६२ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत सहयोग मंदिर येथील मंगेशकुंज पासुन जोग टॉवरपर्यंत साईड पट्टीवर पेव्हर ब्लॉक बसविणे, झाकणे बसविणे इ.कामे करणेबाबत.

५० नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६२ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत सहयोग मंदिर पथ येथील जोग टॉवर ते सहयोग मंदिरपर्यंत साईड पट्टीवर पेव्हर ब्लॉक बसविणे व झाकणे बसविणेबाबत.

५१ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत जन. अरूणकुमार वैद्य मार्गावरील जन.वैद्य यांच्या पुतळ्यापासुन परमार्थ निकेतन चौकापर्यंत रस्त्यावर लेन मार्किंग करणे व झेब्राक्रॉसिंगचे पट्टे रंगविणेबाबत.

५२ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत जन.अरूण कुमार वैद्यमार्गावरील ठामपा मुख्यालय ते परमार्थ निकेतन चौकापर्यंत रस्त्यावर लेन मार्किंग करणे व झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविणेबाबत.

५३ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत जन.अरूणकुमार वैद्य मार्गावर ब्लिंकर्स बसविणे व अस्तित्वातील कर्बस्टोनला रंगकाम करणेबाबत.

५४ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत धर्मवीर मार्गावरील सरस्वती शाळेपासुन स्वामी विवेकानंद चौकापर्यंत रस्त्यावर लेन मार्किंग करणे व झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविणेबाबत.

५५ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत नामदेववाडी येथील चिंतामणी घरकुल संकुलनामागे गटार बांधणेबाबत.

५६ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत सर्व्हीस रोडवरील बाळगोपाळ मित्र मंडळाजवळील सार्व.संडासचे नुतनीकरण करणेबाबत.

५७ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६८ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत धर्मवीर मार्गावरील स्वामी विवेकानंद चौक ते सर्व्हीस रोड कमानीपर्यंत रस्त्यावर लेन मार्किंग करणे व झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविणेबाबत.

५८ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, राघोबा शंकर रोड रस्त्यालगत चिराग आर्केड ते स्नेहवसंत इमारतीसमोर गटार व फुटपाथचे काम करणेबाबत.

५९ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत एफ.आर.पी. बेंचेस बसविणेबाबत.

६० नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये, लोहार आळी येथे मिनी हायमास्ट लावणेबाबत.

६१ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६० मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत जांभळी नाका येथील गणेश मंदिर ते के मोडंस ज्वेलर्स पर्यंत व कलव्हर्टचे काम करणेबाबत.

६२ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६० मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत राममंदिर इमारत क्र.२ मागे गटार बनविणेबाबत.

६३ नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्र.६० मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत राममंदिर इमारत ते सुर्या राईस मिल्स ते हनिफा मंझीलपर्यंत गटार बनविणेबाबत.

**(बाळाराम माने)**
उपप्रभाग अधिकारी,
नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

..............................

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

सचिव विभाग,
नौपाडा प्रभाग समिती,
दिनांक :- २४.०६.२००९

मा.नौपाडा प्रभाग समिती सभा
सभा सूचना क्र.२, दि.१८.०६.२००९
सभा क्र. १, दि.२४.०६.२००९

प्रति,
मा.श्री./श्रीमती ..............................
सन्मा.सदस्य/सदस्या, नौपाडा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महोदय/महोदया,

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीची सभा, सभा सूचना क्र.२, दि.१८.०६.२००९ अन्वये, बुधवार, दि.२४.०६.२००९ रोजी दुपारी ४.०० वा. ''कै.मो.दा.जोशी सभागृह'', नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, शाहू मार्केट, ठाणे येथे बोलविण्यांत आली होती.

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सौ.अनिता हिराकांत फर्डे | अध्यक्षा |
| २. | मा.श्री.संजय संतु वाघुले | सदस्य |
| ३. | मा.श्री.नारायण शंकर पवार | सदस्य |
| ४. | मा.सौ.सुजाता भास्कर पाटील | सदस्या |
| ५. | मा.सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ६. | मा.सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ७. | मा.श्री.पुंडलिक मारूती थोरवे | स्विकृत सदस्य |
| ८. | मा.श्री.मुकुंद रामचंद्र जाधव | स्विकृत सदस्य |
| ९. | मा.श्री.प्रकाश धोंडू पायरे | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य गैरहजर होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.विलास शिवराम सामंत | सदस्य |
| २. | मा.श्री.अशोक बारकु वैती | सदस्य |
| ३. | मा.श्री.महदीप बिष्ट (मुन्ना) | सदस्य |
| ४. | मा.सौ.शांता शामजी सोलंकी | सदस्या |

मा.प्रभाग अधिकारी सभेचा अजेंडा वाचून दाखवितात.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, गेले पाच दिवस झाले ड्रेनेज विभाग, जवाहर बाग येथील फोन बंद आहे. अशावेळी आम्ही तक्रारी कुणाकडे करायच्या ? गाडी लवकर उपलब्ध होत नाही. नवीन गाडया उपलब्ध

करून देण्यांत आलेल्या आहेत, परंतु नौपाडा प्रभाग समितीसाठी नवीन गाडी उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे ? नौपाडा प्रभाग समितीमध्ये डांबरीकरणाचे काम चालू होते, त्यावेळी ड्रेनेजचे चेंबर खाली गेलेले आहेत. पाईप वरती आहेत, त्यामुळे बाईकवगैरे चालविताना त्या ठिकाणी अपघात होतात.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, मी पंधरा दिवसापूर्वी जवाहर बाग येथील ड्रेनेजचा फुल चार्ज घेतलेला आहे.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, फोन बंद आहे, त्याबाबत तक्रार केली का ? सन्मा.नगरसेवक, नागरीक आपल्याकडे तक्रार करतात. परंतु आपला फोन बंद असतो. मेंटनन्सची जबाबदारी कोणाची ? चेंबर रस्त्याच्या खाली गेलेले आहेत. महिला / पुरूष बाईक चालवितात. अशावेळी अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण ?

***सन्मा.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा. वाघुले साहेबांनी जो चेंबर विषयी मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. पावसाळ्यामध्ये जास्त त्रास होत आहे. आपल्याकडे महिला, मुली गाडया चालवितात. गेल्यावर्षी असाच अपघात गोखले रोड येथे घडलेला आहे. तरी आपल्याला विनंती आहे की, रात्रंदिवस काम चालू ठेवा परंतु, काम पूर्ण करून घ्या.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा भागातील नागरीक आपल्याकडे तक्रारी करीत असतात. ज्या ठिकाणी चेबर खाली गेले आहेत, ते काम तातडीने पूर्ण करून घ्या. माणुस मेल्यानंतर आपण काम करणार का ? तसे झाले तर बातमी येईल आणि त्याच्यानंतर तुम्ही जागे होणार. तरी आपण या पूर्वीच काम करून घ्या. प्रभागामध्ये मेन्टनन्स करता म्हणजे आपण काय-काय काम करता.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, चोक-अप काढणे या सारखी कामे करून घेतो.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपण प्रभागामध्ये मेन्टनन्समध्ये काय-काय करता. एक - दिड वर्षात कुठे - कुठे आणि काय - काय केलेले आहे, काही केलेले दिसत नाही. वारंवार तक्रारी येतात.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, वाघुले साहेबांनी चांगला मुद्दा मांडलेले आहे. शहरामध्ये ड्रेनेजबाबत बऱ्याच नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. डांबरीकरण केल्यानंतर ड्रेनेज लाईन बुजून जातात. कुठे चेंबर आहे ते सापडत नाही. कित्येक वेळा दहा ठिकाणी खोदकाम केले जाते आणि तरीही चेबर मिळत नाहीत. चेंबर कुठे आहे त्याचा नकाशा बनवा. दुसरे म्हणजे डांबरीकरण करताना थरावर थर लावले जातात तर तसे थर लावू देऊ नका. बिल्डिंग खाली आणि रस्ता वरती असे झालेले आहे. लेवल रस्त्यापासून किती आहे याची दक्षता घ्यावी. रस्ता कशा प्रकारे बनविला जावा याची दक्षता घ्यावी. कधी - कधी स्पिड ब्रेकर करतात तसे पॅच लावले आहेत. खड्डे बुजवितांना त्याची दक्षता घ्यावी.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, जवाहर बाग येथील फोन तातडीने चालू करून घ्या. सन्मा.नगरसेवक, नागरीक यांच्या तक्रारी असतात. गेले दहा ते पंधरा दिवस फोन करतो परंतु फोन लागत नाही.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, त्या पूर्वीसुध्दा फोन करत होते, परंतु फोन लागत नाही. तक्रार कोणीही नोंदवून घेत नाहीत.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, रस्त्याचे चेंबर खाली गेलेले आहेत, त्यांची लेवल करून घ्या. आम्हा नगरसेवकांना नागरीक दोष देतात. नगरसेवकांनी सांगितलं तरी आपण कारवाई करत नाही, खाजगी हॉटेलवाले यांच्या तक्रारी येतात त्यावेळी आपण करावाई करता.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, फोन बंद केला म्हणजे जबाबदारी संपली असं होतं का ? फोन बंद म्हणजे तक्रार येणार नाही असं आहे का ? ड्रेनेज विभागाचे कामगार १२ वाजता कामावर येतात आणि ४ वाजता तुमची सुट्टी होते. कामगारांच्या कामाची वेळ कोणती आहे . ड्रायव्हर किती वाजता कामावर येतात आणि किती वाजता गाडी चालवितात ते विचारा. किती वाजता काम चालू करता ?

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीअंतर्गत कामगारांच्या कामाच्या डयुटीची वेळ सांगा.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, सकाळी ८.३० ते ४.३० अशी आहे.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, सकाळी ८.३० ते दुपारी ४.३० ही कामाची वेळ आहे, परंतु आपण काम किती वाजता चालू करता ते सांगा. सकाळी ११ वाजता पेटीवरून निघतात. ते कोणत्या ठिकाणी असतात तेच माहीत नसतं. नौपाडा प्रभाग समितीसाठी एक गाडी उपलब्ध करून द्यावी म्हणून सांगितले. परंतु गाडी मिळत नाही.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीकडे गाडी उपलब्ध करून देण्याबाबत प्रोसिजर चालू आहे. कोपरी प्रभाग समितीकडे सहा.आयुक्तांच्या आदेशाने गाडी दिलेली आहे. प्रत्येक प्रभाग समितीला गाडया देण्यांत येणार आहेत. प्रोसिजर चालू आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, ड्रेनेजबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत. आपल्याकडे कर्मचारी वर्ग किती आहे याचा मला खुलासा करावा.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, मी आहे आणि इतर काही कर्मचारी / बिगारी आहेत.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपण जे वार्षिक ठेकेदार नेमता ते आपले ऐकत नाहीत. त्यांना काढून टाका.

***श्री.सुनिल साजनानी - कनि. अभि.-ड्रेनेज विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, वार्षिक ठेकेदाराला एक वर्षाचा ठेका दिला आहे. परंतु त्यांना देण्यात आलेली अमाऊंट ही जवळ-जवळ एक ते दिड महिन्यांपर्यंतच पुरण्याची शक्यता आहे.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, ड्रेनेज विभागाबाबत नागरिकांच्या तक्रारी असतात. नागरीक तेथे जावून तक्रार करतात परंतु तेथे कुणीच भेटत नसल्यामुळे ते आम्हाला सांगतात. पंधरा दिवस झाले तरी तेथे कुणाची भेट होत नाही. गाडी येत नाही. माझ्या प्रभागात रामवाडी येथे नेहमीच समस्या असते. त्या ठिकाणी कोणीही येत नाही. तक्रार लिहून घेत नाहीत.

***सन्मा.श्री.प्रकाश पायरे :-***

मा.अध्यक्ष महोदया, आम्ही फोन केल्यानंतर तक्रार लिहून घेणारा आहे त्याला लिहीता येत नाही. मग अशा व्यक्तीला तेथे का बसविता. श्री.कारंडे म्हणून कोणी आहे. तर त्या ठिकाणी सुशिक्षित कर्मचाऱ्याला बसवा. दुसरी गोष्ट म्हणजे, गटारे साफ करण्यासाठी आपल्याकडे माणसे मिळत नाहीत. पंधरा दिवस सांगितले तरी माणसे मिळत नाहीत.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, तीन दिवस झाले तरी भेटत नाहीत. फोन उचलत नाहीत. रामवाडी येथे लाल माती, कचरा उचलला जात नाही. बेकरी येथेही कारवाई केली नाही.

***श्री.महाजन - स्व.नि.***

मा.अध्यक्ष महोदया, रामवाडी येथील लाल माती बांधकाम विभागाने उचलली नसल्यामुळे आम्ही ती माती उचलून घेतलेली आहे. तसेच बेकरीच्या येथे नेहमीच कारवाई चालू असते. जर का काही समस्या असेल तर करवाई करण्यांत येईल.

***सन्मा.श्री.प्रकाश पायरे :-***

मा.अध्यक्ष महोदया, आरोग्य विभागाकडे ४० माणसे आहेत. आपत्कालीनची पुस्तीका छापली त्यामध्येही नंबर दिलेले आहेत, परंतु नंबर लागत नाहीत. गटारे साफ करू शकत नाहीत, आश्वासने दिली जातात. डंप्पर मिळत नाहीत. आपल्या महापालिकेचा एवढा मोठा बजेट आहे तो कशासाठी ? आपण गटार साफ करू शकत नाहीत तर काय करता ? शाहू मार्केटसाठी मशीन दिलेली आहे का ? मच्छरच्या मशीन आहेत त्या चार पैकी तीन नादुरूस्ती आहेत आणि असे असेल तर काम काय करणार?

***श्री.चोपडे - स्व.नि.:-***

मा.अध्यक्ष महोदया, मेंटनन्ससाठी पाठविल्या आहेत.

***सन्मा.श्री.प्रकाश पायरे :-***

मा.अध्यक्ष महोदया, डेंग्युची साथ आलेली आहे. पावसाळ्याचे दिवस आहेत. आपल्याकडील चार पैकी तीन मशीन बिघडलेल्या आहेत. मला सांगा नवीन मशीन बिघडतात का ? आपण कुठल्या कंपनीकडून घेतल्या आहेत. २२ जूनला तीन मशीन बिघडलेल्या आहेत. डेंग्युची साथ आहे त्यावर आपण काय उपाययोजन करणार ते मला सांगा. काय खबरदारी घेतलेली आहे. कारवाई का होत नाही. कधी मिळणार ते सांगा.

***श्री.चोपडे - स्व.नि.:-***

मा.अध्यक्ष महोदया, दोन तीन दिवसात मिळणार आहेत. कळवा येथे दुरूस्तीसाठी गेलेल्या आहेत. त्यांना परत फोन करून लवकर देण्याबाबत सांगतो.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, आता पावसाळा जवळ आलेला आहे. या ठिकाणी सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित नसतील तर ही सभा बरखास्त करा. मी या ठिकाणी ३.४५ वा. आलो. पवार साहेब ४.१५ वा. आले आहेत. आम्ही आमची कामे सोडून येत असतो. परंतु या ठिकाणी काही कामे होत नसतील तर सभेचा काय उपयोग आहे. फोनवरून कामे करता येतील. आरोग्य विभागाचे कोणी उपस्थित आहे का ? शहर विकास विभागाचे कोणी अधिकारी उपस्थित आहेत का ? मा.अध्यक्ष महोदया, दुसरी गोष्ट म्हणजे, पावसाळा आलेला आहे. आपल्याकडे खाद्यपदार्थ पेपरमध्ये दिले जातात. तो पेपर प्रेसवाले, वितरक या सारख्या कितीतरी लोकांच्या हातून गेलेला असतो. जवळजवळ ५० लोकांच्या हातून तो पेपर गेलेला असतो. त्याची शाई लागते ती शाई पसरते आणि त्यापेपरमधून खाद्यापदार्थ दिला जातो. तर त्याबाबत काही दक्षता घेता येईल का ? पेपरच्या ऐवजी डिशचा वापर करता येईल अशी काय व्यवस्था आपल्याला करता येईल का ? मा.अध्यक्ष महोदया, पाणी विभागाचे कोणी आले आहे का ? आपल्याकडे होणारे पाणी वितरण हे चांगलेही नाही आणि वाईटही नाही. परंतु पावसाळ्यामध्ये आरोग्याच्या दृष्टीने फ्लोरिंग वगैरेचा वापर करावा. काही ठिकाणी पाण्याची लाईन तुटलेली असेल तर दुरूस्त करावी. गढूळ पाणी असेल त्यावर उपाय करावा.

***श्री.विनोद पवार:-उप अभि.पाणी पु.विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे गढूळ पाण्याची तक्रार प्राप्त झाल्यास आपण आम्हाला सांगा आम्ही ते काम करून घेतो. गटारे, नाले येथील पाण्याच्या लाईन काढलेल्या आहेत. काही तक्रारी आल्या तरी कारवाई करून घेवू.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, पाणी भरले तर ती जबाबदारी कोणाची आहे ?

***श्री.विनोद पवार:- उप अभि.पाणी पु.विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, पाणी भरलेतर महापालिकेच्या सगळ्याच विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या डयुटया लावलेल्या आहेत. आपत्कालीन कामासाठी ते कुणाचीही ऑर्डर काढू शकतात. पाणी विभागाचे असतील तरी आणि दुसऱ्या विभागाचे असतील तरी त्यांची डयुटी असते.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, फायरब्रीगेडच्या बाबतीत माझा प्रश्न आहे. यापूर्वीही आम्ही कित्येक वेळा गाडीची मागणी केलेली आहे. परंतु गाडी मिळत नाही.

***श्री.आर.जी.परदेशी - फायब्रीगेड विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी फायब्रीगेडच्या गाडीबाबत प्रशन उपस्थित केलेला आहे. त्याबाबत मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव तयार करून दिलेला आहे. त्याबाबत काम चालू आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, मागील सभेमध्ये उत्तर मिळाले होते. त्यानंतर आचार संहिता लागू झाली आणि त्यानंतर आता परत तोच प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण या ठिकाणी जबाबदारीने उत्तरे द्या.

***श्री.आर.जी.परदेशी - फायब्रीगेड विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, काम चालू आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, काम कुठे चालू आहे ?

***श्री.आर.जी.परदेशी - फायब्रीगेड विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया,मुंब्रा येथे काम चालू आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची पुस्तिका आहे. शहर विकास अधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांची नावे दिलेली आहे. परंतु ती माणसे आहेत कुठे ? ही माणसे जबाबदार अधिकारी आहेत. आता पावसाळा जवळ आलेला आहे.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, म.गांधी रोड फडके रोड येथील विहंग बिल्डिंग मागील खापरी यांच्या प्रॉपर्टीमधील धोकादायक इमारत पाडण्यात आली असून, त्या इमारतीचे रॅबीट अजूनपर्यंत उचलले गेले नाही. जवळजवळ आठ वर्षे झाली आहेत, त्यामुळे तेथे साप, घुशी असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका होऊ शकतो. पावसाळ्यामध्ये पाणी घुसन तसेच पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने आरोग्याला धोकादायक आहे. आणि हे सात-आठ वर्षे घडत आहे. आजूबाजूला पाच - सहा सोसायटया आहेत. तेथील तळमजल्याला पाणी भरते. याबाबत वारंवार सांगितलेलं आहे. तरी सदरहू रॅबीट उचलून घेण्यात यावे.

***श्री.निमसे - स्व.नि. :-***

मा.अध्यक्ष महोदया, त्यांना नोटीस पाठविलेली आहे. आठ दिवसामध्ये तेथील रॅबीट उचलून घेतो.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, त्या जागेच्या मालकाला आपण नोटीस दिलेली आहे. त्या नोटीसला उत्तर न देता जागा मालक ते रॅबीट उचलण्याबाबत टाळाटाळ करतो. अशा परिस्थितीत आठ दिवसामध्ये उचलेले नाही तर काय करावाई करणार आहात ?

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आजू-बाजूच्या सोसायटयांना त्रास होत आहे, आपण त्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करा.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, सदरहू ठिकाणची रॅबीट दहा दिवसामध्ये उचलले पाहिजे आणि उचलले नाही तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा. मा.अध्यक्ष महोदया, गेल्या दोन तीन महिन्यापासुन जाहिरात विभागाच्या तक्रारी येत आहेत. गोखले रोड या ठिकाणी वैद्य यांचे हॉस्पीटल आहे. त्या ठिकाणी दिशा दर्शक फलक फुटपाथवर नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. त्यावर काय कारवाई करणार आहात ते सांगा.

***श्री.खानापूरकर - परवाना निरिक्षक, जाहिरात विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, नौपाडा प्रभाग समितीकडे पत्र पाठविलेले आहे आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यांत येईल.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, नोटीस दिलेली आहे. परंतु कधी काढणार आहात.

***श्री.खानापूरकर - परवाना निरिक्षक, जाहिरात विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, दोन दिवसात काढून घेतो.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, अतिक्रमण विभागाविषयी बोलायचं आहे. आपल्या अतिक्रमण विभागाने ठाणे स्टेशन परिसरात चांगल्या प्रकारे कारवाई केली आहे. त्यामुळे सॅटीसच्या कामाचा वेगसुद्धा वाढलेला आहे. परंतु जवाहर बाग पेटीच्या ठिकाणी भंगार सामानाची विल्हेवाट लावली जात नाही. जवाहर बाग येथे टपऱ्यांचा सुळसुळाट झालेला आहे. १०-१२ टपऱ्या आहेत. ठाणे स्टेशन परिसर स्वच्छ केले त्याप्रमाणे गणपती मंदिर ते अशोक सिनेमा हा परिसर स्वच्छ करणे गरजेचे आहे. सॅटीसचे काम चालू असल्यामुळे एसटी गाडया, टीएमटी गाडया यांची वाहतुक त्या रस्त्याने चालू असते आणि तो रस्ता पूर्णपणे फेरीवाल्यांनी व्यापला आहे. तेथे कारवाई करण्यांत यावी, जेणेकरून तेथे काही अपघात होणार नाही. त्या ठिकाणी वर्षभरात एक लहान मुलगा आणि एक व्यक्ती मृत पावली होती. तहसिलदार कार्यालयाला पूर्ण गराडा घातलेला आहे. तरी स्टेशन परिसरात जशी कारवाई केली तशी कारवाई गणपती मंदिर ते अशोक सिनेमा हा परिसर स्वच्छ करण्यांत यावा. तसेच, गोखले रोड, तांबे हॉस्पीटलकडे जाणारा रस्ता आहे. तेथे वाहनांची ये-जा चालू असते. तेथे चार-पाच हातगाडीवाले, फेरीवाले यांनी तो रस्ता पूर्ण व्यापला आहे. त्या ठिकाणीसुद्धा करवाई करा.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, गावदेवी मैदान येथे गार्डन समोर तिन्ही बाजूला पार्किंग लावलेली असते. त्यांच्यावर कारवाई केली त्याबद्दल आभार मानते. परंतु त्या ठिकाणी हातगाडया लावल्या आहेत. त्यामुळे कारवाई करून उपयोग काहीच नाही. तेथून नागरिकांना चालण्यासाठी रस्ता मोकळा नाही. गार्डनच्या जवळच टपऱ्याही टाकल्या गेल्या आहेत. आपण तेथील पार्किंग हटविले परंतु आता त्या ठिकाणी हातगाडया लागतात. समोरच बेडेकर हॉस्पीटल येथे दोन - तीन बायका कचरा टाकतात. कचऱ्याचा ढिग असतो. त्यांना तेथे कचरा टाकण्यासाठी जागा दिलेली आहे का ? नाहीतर त्यांना अन्य ठिकाणी हलवा. कारण तेथे नागरिकांना चालायला जागा नसते आणि कचऱ्याचा पूर्ण वास बाजूला असलेल्या बेडेकर हॉस्पीटलमध्ये येतो.

***श्री.भगवान विंदे - स्व.नि. :-***

मा.अध्यक्ष महोदया, तेथील कचरा उचलला जातो. आणि टपऱ्याबाबत अतिक्रमण विभाग लक्ष देते.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, कचऱ्याच्या गोणी टाकलेल्या असतात. अर्ध्या बांधलेल्या अवस्थेत कॅबीनमध्ये टाकतात. तेथील टपऱ्या जप्त करा आणि तो रस्ता नागरिकांना चालण्यासाठी मोकळा करा. कारवाई सतत चालू ठेवा. पार्किंग हटवून काय उपयोग आहे.

***श्री.भगवान विंदे - स्व.नि. :-***

मा.अध्यक्ष महोदया, तेथील कचरा उचलून घेतो. दोन्ही सत्रामध्ये काम चालू आहे.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, काही जणांना मार्केटमध्ये जागा नाही. टपऱ्या सगळ्या उचलता येत नसतील तर मार्केट बांधायला घ्या आणि जे मार्केटमध्ये नाहीत त्यांना तेथून हटवा.

***सन्मा.सौ.स्मिता देशमुख :-***

मा.अध्यक्ष महोदया, गेल्या अनेक वर्षापासुन मा.महाभेमध्ये, मा.स्थायी समितीमध्ये प्रभाग समितीमधील फुटपाथवरील अतिक्रमण रस्त्यावरील अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले ह्या विषयांवर लक्षवेधीद्वारे, प्रश्नांद्वारे, सभागृहात गरमा-गरम चर्चा होते. अतिक्रमणे, फेरीवाले हटविण्याचे प्रशासनाकडून आश्वासन मिळते. थातूर - मातूर कारवाई होते. पुन्हा येरे माझ्या मागल्या अविरतपणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या कृपा-आशिर्वादाने फेरीवाल्यांकडून पादचाऱ्यांचा छळ चालू आहे. दिवसेंदिवस फेरीवाल्यांची संख्या वाढत चालली आहे. पुन्हा नव्या जोमाने फुटपाथ अडवले जात आहेत. फुटपाथवर टपऱ्या उभ्या

रहात आहेत. बहुसंख्य फेरीवाले हे अमराठी / परप्रांतिय आहेत. संध्याकाळी रस्त्यावरून चालतांना वाटते की आपण महाराष्ट्रात आहोत की परप्रांतात आहोत ? फेरीवाल्यांचा बंदोबस्त करता येत नसेल तर माझी सुचना आहे की, ह्या विषयाला पूर्णविराम द्यायचा असेल तर महिला बचत गटांना फेरीवाल्यांचे भाजी परवाने फळविक्री इत्यादी परवाने द्या. रस्ता, विभाग निहाय फेरीवाल्यांची संख्या व वेळ ठरवा, महिला बचत गटातूनच 'दक्षता पथक' नेमा महिला बचत गटामध्ये बहुसंख्य मराठी भाषिक व आर्थिक दुर्बल घटकातील महिला आहेत. एक समाधान मिळेल की मराठी महिलांना उद्योग अपलब्ध करून दिला, त्यांना रोजी-रोटी मिळाली, महिला बचत गटाचा संघटीत ताफा असल्यामुळे महानगरपालिकेचेही फेरीवाल्यांवर नियंत्रणही राहिल.

अध्यक्ष महोदया, महिला बचत गटांना फेरीवाल्यांचे परवाने देण्याबाबत आजच्या सभेत ठराव मंजूर करून महासभेकडे अंतिम निर्णयासाठी पाठवावा. धन्यवाद ! जय हिंद जय महाराष्ट्र !

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सौ.देशमुखबाई यांनी आता जो ठराव मांडला त्या ठरावाला मी अनुमोदन देत आहे. मा.अध्यक्ष महोदया, म.गांधी रोड, गोडबोले हॉस्पीटलसमोर विद्युतचे दोन पोल बंद आहेत ते चालू करून घेण्यात यावेत.

***श्री.विनोद इंगळे - क.अ.-विद्युत :-***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांनी सांगितलेल्या ठिकाणचे पोल उद्या चालू करून घेण्यात येतील.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, प्रकाश पडत नाही पूर्ण अंधार असतो.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आता सन्मा.सदस्यांनी विद्युत पोल लागत नाहीत म्हणून तक्रार केली. परंतु आपण पोलवर स्पेअर पार्ट लावतो तो किती चालू राहतो याची नोंद घेता का ?

***श्री.विनोद इंगळे - क.अ.-विद्युत :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपण तशी नोंद घेतो. त्याची गॅरेंटी सहा महिन्याची असते.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आम्ही ज्या तक्रारी करतो, त्यावर आपण ॲक्शन घेता. वार्षिक ठेकेदार काय करतो. ते दिवे लावण्याची जबाबदारी कोणाची असते. आम्ही तक्रार करतो, त्यानंतर आपण नोंद घेता. स्पेअरपार्ट बदलता

***श्री.विनोद इंगळे - क.अ.-विद्युत :-***

मा.अध्यक्ष महोदया, वेगवेगळ्या समस्या असतात.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, डयुप्लीकेट स्पेअरपार्ट आपण लावत असतो का ?

***श्री.विनोद इंगळे - क.अ.-विद्युत :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपण सॅम्पल चेक करतो आणि नवीनच लावतो.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, खर्च कसा करावा ते विद्युत विभागाकडून शिकावं. चांगले असलेले विद्युत पोल कापून काढतात. हा होणारा खर्च जनतेच्या पैशातून होत असतो. चांगले पोल कशाला कापता. लाईट लागले नाही की नागरीक आंम्हाला विचारतात. नागरिकांना उत्तर आंम्हाला द्यावे लागते.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील:-***

मा.अध्यक्ष महोदया, सरस्वती शाळेच्या जवळील रस्तारूंदीकरणाबाबत दोन-दोन पत्रे दिलेली आहेत. परंतु काहीच कारवाई झालेली नाही. सरस्वती शाळा सुटल्यानंतर मुलांना घेण्यासाठी पालकांची गर्दी रस्त्यावर असते. त्यामुळे त्यांना त्रास होतो.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, चंद्रनगरचा रस्ता रोड वायडिंगमध्ये वाढवून दिलेला आहे. दुसर म्हणजे सरस्वती शाळेच्या रस्त्याबाबत शहर विकास विभागाकडून माहिती घेवून, तो रस्ता रूंदीकरणाचा प्रस्ताव लवकरात लवकर करून घेवू.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील:-***

मा.अध्यक्ष महोदया, लवकर म्हणजे कधी ?

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, डी.पी. प्रमाणे घ्यावा लागणार आहे.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील:-***

मा.अध्यक्ष महोदया, चिखलवाडी नाल्याच्या येथे घरे आहेत. त्या घरांमध्ये लहान मुले असतात आणि त्यामुळे त्या नाल्याला जाळी लावणे आवश्यक आहे. तरी त्याबाबत लवकरात लवकर कारवाई करावी.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, दोन दिवसामध्ये त्या नाल्याला जाळी बसवून घेतो. चेतना सोसायटीचे पत्र आले होते.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, नाल्याची साफसफाई करण्यांत आली. माझ्या प्रभागामध्ये एम.एच. हायस्कूल येथील नाल्यावर जाळी बसविण्याचा प्रस्ताव तयार करणार होते त्याचे काय झाले. त्या नाल्यामध्ये कचरा टाकयला सुरूवात झालेली आहे. सन्मा.सदस्या.पाटीलबाई यांनी प्रस्ताव मांडलेला होता. तो प्रस्ताव तयार करणार का ?

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, ते काम करून घेण्यास सांगतो. प्लिंथ करून घेतलेले आहे. ते आता लावायला घेतो.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, पंधरा दिवसामध्ये काम करून घ्या.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, गटाराचे प्लिंथ करून घेतो.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, गोखले रोड, समर्थ भंडार येथे रसत्यावर खड्डे पडलेले आहेत. त्या ठिकाणी बाईक स्लिप होतात. ठाकूर गल्ली येथीलही काम करून घेण्यात यावे. मा.अध्यक्ष महोदया, जवाहर बाग येथील पेटीवर श्री.भगवान हरवटे म्हणून कर्मचारी काम करीत आहे. त्याला त्या ठिकाणी किती वर्ष झाली. त्या कर्मचाऱ्याबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. अतिक्रमण विभागामध्ये ज्या कर्मचाऱ्यांना तीनपेक्षा जास्त वर्षे झालेली आहेत, त्यांची बदली करण्यांत यावी.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना आहे की, रस्त्यावरील पोलचे बॉक्स लावलेले असतात, ते बॉक्स तुटलेले असतात त्यांची दुरूस्ती तातडीने करून घेण्यात यावी. नाही तर शॉक बसू शकतो. तरी त्याबाबत कारवाई करा.

***श्री.विनोद इंगळे - क.अभि.वि.विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, विद्युत पोलवरील बॉक्सचे काम चालू केलेले आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, वृक्षप्राधिकरण विभागामध्ये आपल्याकडे डंप्पर किती आहेत.

***श्री.अशोक सुर्वे - उद्यान विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपल्याकडे भाडयाचे दोन डंप्पर आहेत.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, ते डंप्पर आपण कुठे - कुठे वापरता ?

***श्री.अशोक सुर्वे - उद्यान विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, कोपरी प्रभाग समिती, उथळसर प्रभाग समिती आणि नौपाडा प्रभाग समिती या तीन ठिकाणी वापरतो.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, ते डंप्पर कमी पडतात असे आपल्याला वाटत नाही का ? झाडे पडली तर आपण काय करणार ? आपण त्याबाबत वरिष्ठांना तसे कळवा, डंप्परची मागणी करा.

***श्री.अशोक सुर्वे - उद्यान विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, प्रस्ताव बनविलेला आहे.

***सन्मा.श्री.पुंडलिक थोरवे :-***

मा.अध्यक्ष महोदया, ते काम कोण पाहतात.

***श्री.अशोक सुर्वे - उद्यान विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, ते काम गावडे साहेब पाहतात.

***सन्मा.श्री.मुकुंद जाधव :-***

मा.अध्यक्ष महोदया, ब्राह्मण सोसायटी येथे असलेले गटार रेल्वेने बंद केलेले आहे. हिंदु कॉलनी येथून जाते. परंतु ते गटार बंद केल्यामुळे पाणी जाणार कुठून ?

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, त्या गटाराचे काम चालू आहे. ते काम करून घेतो.

***सन्मा.श्री.प्रकाश पायरे :-***

मा.अध्यक्ष महोदया, मासुंदा तलावाचे काम चालू आहे. त्या कामाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे या सारख्या पक्षांची लोकं भ्रष्टाचार झाल्याचे बोलतात आणि त्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. आपले चांगले अधिकारी काम करीत असताना अशा बातम्या प्रसिद्ध होत आहेत. आपण त्याचे स्पष्टीकरण करत का नाही. त्याचे स्पष्टीकरण योग्य वेळी होणे आवश्यक होते ते झाले नाही. तो खुलासा का केला नाही.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, त्याबाबत प्रसिद्धीसाठी खुलासा दिलेला आहे.

***सन्मा.श्री.प्रकाश पायरे :-***

मा.अध्यक्ष महोदया, परंतु आलेला नाही. याबाबत आपण पी.आर.ओ. यांच्याशी बोलून घ्या आणि तो खुलासा करा.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, त्याच्या प्रती श्री.माळवे साहेबांकडे देण्यात आलेल्या आहेत. त्यांना त्याबाबत विचारून घेतो.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, मासुंदा तलाव भ्रष्टाचार प्रकरणी महापालिकेने खुलासा करायला पाहिजे. आपण खुलासा केला पाहिजे. म्हणजे आम्हाला कोणी विचारलं तर तसं सांगता येईल. तरी खुलासा झाला पाहिजे.

***श्री.नितीन पवार - कार्य.अभि., सा.बां.:-***

मा.अध्यक्ष महोदया, सविस्तर खुलासा दिलेला आहे.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, गांवदेवी येथे इंदुबाई गोतावळे यांचे घर आहे. तेथे जाहिरातवाल्यांनी शेड बांधलेली आहे. गांवदेवी मैदान येथे आहे. ती शेड घरावर येत आहे. त्या शेडला कुणी परवानगी दिली का ? ती बाई सतत तक्रार करीत आहे. म्हातारी बाई राहत आहे. आपल्याकडे अधिकाऱ्यांना विचारलं तर ते म्हणतात ते माझ्याकडे नाही. तिला त्रास होत आहे.

***श्री.खानापूरकर - परवाना निरिक्षक, जाहिरात विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, मी स्वतः लोंढे यांना सांगितले होते. त्याबाई माझ्याकडे आल्या होत्या. मी त्या ठिकाणी स्वतः जावून पाहाणी करून आलो आणि वरिष्ठांना तसे कळविलेले आहे.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आज ती म्हातारी बाई किती दिवस झाले तक्रार करीत आहे. तिला जर काय झालं तर काय परिस्थिती होईल.

***सन्मा.सौ.सुहासिनी लोखंडे :-***

मा.अध्यक्ष महोदया, माझ्याकडे सुद्धा आले होते.  सहा - सात महिने झाले तक्रार केली आहे.

***श्री.खानापूरकर - परवाना निरिक्षक, जाहिरात विभाग :-***

मा.अध्यक्ष महोदया, त्या ठिकाणी कारवाई केली होती.  परंतु नंतर परत मंजूरी देण्यात आली.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, त्याला परवानगी का द्यायची कशाला.  आपण ती शेड पूर्ण का नाही तोडून टाकत.  मी सभेमध्ये सतत ओरडून सांगत असतो.  फुटपाथवर अतिक्रमण झालेले आहे ते साफ करा, परंतु कोणीही त्याची दाखल घेत नाही.  आमचे सन्मा.सदस्य वाघुले, थोरवे, जाधव, पायरे, सर्वच सदस्य चर्चा करतात.  ठाणे शहर चांगले, सुंदर व्हावे, फुटपाथ चांगले असावे अशी भावना असते, परंतु त्याची दखल घेतली जात नाही.  फक्त सभेच्या अगोदर दोन दिवस कारवाई करता.  म्हणजे आम्ही बोलतो तेव्हाच कारवाई करायची का ?  सीएनजी गॅस भरण्यासाठी फायरब्रीगेडवाल्यांनी परवांनगी दिली, त्यांना त्याचे काहीच पडलेले नाही.  रिक्षांनी पूर्ण घेराव घातलेला असतो.  तो दाटीघाटी रस्ता आहे, रहदारीचा रस्ता आहे. हॉस्पीटल जवळ आहे,  शाळा जवळ आहे. वंदना सिनेमाच्या तेथे  रस्त्यावर स्पेअरपार्ट लावलेले असतात, गाडया लावलेल्या असतात.  ८० - १०० फुटाचा रस्ता आम्ही या शहरातील नागरिकांसाठी बनविला, परंतु नागरिकांना फुटपाथवरून चालायला जागा नाही.  किती वेळा आम्ही या विषयी चर्चा करायची.  वारंवार सांगूनही, सभेमध्ये चर्चा करूनही काही केले जात नाही. फुटपाथवर बांधकाम केले जाते, त्यांना आपण नोटीसा पाठविता आणि ‘स्टे’ कसा येईल याबाबत त्यांना मार्गदर्शन करता.  आम्ही सर्व सन्मा.सदस्य शहरामध्ये वाहतुक कोंडी होणार नाही याबाबत प्रयत्न करतो आणि आपण अधिक वाढेल असे करता.  आम्ही रस्त्यावरती कोटयाने रूपये खर्च करायचं आणि त्या रस्त्यावरून माणूस जाऊ शकत नाही, गाडी जावू शकत नाही अशी परिस्थिती आहे.  मागे ठाणे वैभव कार्यालयातील एका बाईला गाडीचा धक्का लागला. फुटपाथवरून चालायचं तर गॅरेजवाला थोबाडीत मारेल याची भिती, अशी परिस्थिती आहे.  अशा परिस्थितीत रस्त्यावरून चालायचं कसं आणि असाच कारभार चालणार असेल तर काय उपयोग.  आपल्या माहापालिकेचा मोठा बजेट आहे.  आपल्या लोकांना सुविधा म्हणजे रस्ते, पाणी समस्या प्रभागातील विकास कामे ही आपण वेळेवर करायला पाहिजे, परंतु ती करत नाहीत. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी वाढत चालली आहे. महासभेमध्ये वाहतुकीचा आराखडा बनविला त्यावर कोण लक्ष देणार ?  अशी आपली परिस्थिती आहे. फक्त नगरसेवकांनी तक्रारी करायच्या, आपण काहीच करायचं नाही.  ड्रेनेज लाईन चोक-अप होतात.  त्या ठिकाणी पाणी विभाग, बांधकाम विभाग यांचे लक्ष गेले तरी ते काही बोलत नाहीत.  आपली जबाबदारी नाही असे समजून जबाबदारी ढकलून देतात.  आम्ही त्या विभागाचे नाहीत असे म्हणायचं. परंतु, आपण महापालिकेचे अधिकारी आहोत या नात्याने सबंधीत विभागाला फोन करा.  कुठे गटार वाहतोय, कुठे रस्ता खराब आहे याकडे आमचा जेई पाहतो का ?  त्याने त्याकडे लक्ष दिले पाहिजे.  रस्त्यावर रॅबीट टाकले जाते. कुणाच्या घराचं काम झालं की ते रॅबीट तसेच टाकुन देतात.  कोणीही महापालिकेला घाबरत नाही.    कारण आपण तशी कारवाई करत नाही.    हे शहर सुंदर करावयाचे असेल तर आम्ही तुमच्या बरोबर आहोत. आपण कामाला लागा  आम्ही तुमच्या कामामध्ये अडथळा आणायला येणार नाही. फुटपाथ बघा कसं करतात ते.  पेव्हर ब्लॉकवाला आपले काम करून जातो.  अधिकाऱ्यांचे काम झालेलं असते मात्र नागरिकांचा पाय मुरगळतो अशी परिस्थिती आहे  जनतेला कशाला त्रास देता.  त्यांच्याच पैशातून आपण विकासाची कामे करतो.  जकात विभागामध्ये बदली घेण्यासाठी आपल्यामध्ये स्पर्धा लागते.  पण कशासाठी आपण येथे चांगले काम करत नाही मग जकातला जाऊन काय चांगले करणार आहात ?  आपण आपल्या विभागात असे काम करा की आपले काम पाहून आपल्याला प्रमोशन मिळाले पाहीजे.  आता प्रमोशनच्या ऑर्डर आल्या आम्ही काही बोललो नाही. परंतु आपण जनतेची कामे व्यवस्थित करा, ही विनंती.

***सन्मा.श्री.संजय वाघुले :-***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.श्री.नारायण पवार यांनी काही सूचना केलेली आहे. वंदना सिनेमा, सत्कार हॉटेल, शारदामंदिर शाळा आहे. येथील पूर्ण फुटपाथ व्यापलेले आहेत. जेणेकरून नागरिकांना त्याचा त्रास होणार नाही. त्याबाबत तातडीने करवाई करण्यांत यावी. गोखले रोड, राम मारुती रोड येथे गटार साफसफाई केलेली आहे तेथे काही रॅबीट, माती पडलेली आहे. ती उचलली जात नाही, ती उचलण्याची कारवाई करण्यांत यावी.

***सन्मा.सौ.सुजाता पाटील :-***

मा.अध्यक्ष महोदया, राम वाडी येथे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत, त्याबाबतीत नागरीक आम्हाला विचारतात. त्याबाबत कारवाई करण्यांत यावी.

***मा.श्री.अरविंद पांचाळ - सहा.आयुक्त,***

मा.अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्यांच्या भावनांचा आदर करून, त्यांनी केलेल्या सुचनांची प्रभाग समितीअंतर्गत सर्व संबंधीत खातेप्रमुखांनी त्याची नोंद घ्यावी आणि त्वरीत कारवाई करावी असे मी त्यांना आदेश देत आहे. सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांचा आदर करून, त्या त्वरीत निकालात काढाव्यात. सन्मा.सौ.देशमुखबाई यांनी मांडलेला ठराव पुढील कार्यवाहीसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यांत यावा.

***सन्मा.श्री.नारायण पवार :-***

मा.अध्यक्ष महोदया, आपण किती दिवसात कारवाई करणार ? नाहीतर सन्मा.सदस्य तेच तेच प्रश्न परत उपस्थित करतात. इतिवृत्तांत पाहिलं तर तेच तेच बोललेलं दिसून येईल, आम्ही तेच प्रश्न उपस्थित करतो, त्यामध्ये काहीच बदल नाही. आणि तसं करायचं असेल तर सभा का घेता ?

प्रभाग अधिकारी प्रकरण क्र.२ वाचून दाखवितात

प्रकरण क्र.२ मंजूर

प्रभाग अधिकारी प्रकरण क्र.३ वाचून दाखवितात

प्रकरण क्र.३ मंजूर

प्रभाग अधिकारी प्रकरण क्र.४ वाचून दाखवितात

प्रकरण क्र.४ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.५ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.५ मंजूर



प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.६ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.६ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.७ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.७ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.८ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.८ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.९ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.९ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.१० वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.०१ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.११ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.११ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.१२ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.१२ मंजूर

प्रभाग अधिकारी आयत्यावेळीचे प्रकरण क्र.१३ वाचून दाखवितात

आयत्यावेळीचे प्रकरण क्र.१३ मंजूर

=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=x=xx

प्रकरण क्र.०२ ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.२८.०१.२००९ (तहकुब), दि.१७.०२.२००९ व दि.०४.०४.२००९ (मा.अध्यक्ष निवड) रोजी झालेल्या सभांचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०२, दि.२४.०६.२००९**

ठ रा व :-

ठाणे महानगरपालिकेच्या मा.नौपाडा प्रभाग समितीच्या दि.२८.०१.२००९ (तहकुब), दि.१७.०२.२००९ व दि.०४.०४.२००९ (मा.अध्यक्ष निवड) रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

********************

प्रकरण क्र.०३ नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र.६० मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत वुडन बेंचेस बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०३, दि.२४.०६.२००९**

**ठ रा व :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६० मधील सन्मा.सदस्य श्री.महदीप बिष्ट यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९९,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याण्णव  हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील　　　　　　　　　　　　अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

********************

प्रकरण क्र.०४　　नौपाडा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र.६० मध्ये, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत बाबु नारळवाले दुकानासमोर गटार बनविणे व गणेश मंदिरसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे  या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०४, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६० मधील सन्मा.सदस्य श्री.महदीप बिष्ट यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,६८,८००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,६८,८००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अडुसष्ट  हजार आठशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील　　　　　　　　　　　　अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

***************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.०५ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.५९ मध्ये, नगरसेवक निधी अंतर्गत एस.एफ.आर.सी. कव्हर्स बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०५, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.५९ मधील सन्मा.स्वीकृत सदस्य श्री.पवन कदम यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९९,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष नव्याण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ 'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील    अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

*********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.०६ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत काजुवाडी येथील फेरोनगर चाळ व बेचेन मिस्त्री चाळ जवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०६, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सन्मा.सदस्य श्री.अशोक वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,०७,६००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक,ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,०७,६००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष सात हजार सहाशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

*********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.०७ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत साईबाबा मंदिर जवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०७, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सदस्य सन्मा. श्री.अशोक वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.६९,५००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.६९,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणसत्तर हजार पाचशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील | अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

*********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण.

आ.वे.प्रकरण क्र.०८ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत काजुवाडी येथील श्रीरामचाळ जवळील परिसरात गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०८, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सदस्य सन्मा.श्री.अशोक वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,०५,६००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,०५,६००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष पाच  हजार सहाशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील                                        अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

*********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.०९ — नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६९मध्ये नगरसेवक  निधीअंतर्गत रामचंद्र नगर १ मधील जय महाराष्ट्र चाळीजवळ पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

## मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.०९, दि.२४.०६.२००९

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६९ मधील सदस्य सन्मा.श्री.अशोक वैती यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.९८,४००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.ठाणे यांनी शिफारस केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.९८,४००/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्याण्णव हजार चारशे मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील                                                    अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.१० नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६७ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत सर्व्हीस रोड येथील नटराज सोसायटीसमोरील फुटपाथ नुतनीकरण करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१०, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६७ मधील सन्मा.सदस्या सौ.अनिता हिराकांत फर्डे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.२,००,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील                                                    अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.११ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६२ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत जिजामाता मार्केट येथे गटारावर स्टील झाकणे बसविणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.११, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६२ मधील सन्मा.सदस्या सौ.सुहासिनी लोखंडे यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.३०,८९०/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.३०,८९०/- (अक्षरी रक्कम रुपये तीस हजार आठशे नव्वद मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.१२ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६४ मध्ये नगरसेवक निधीअंतर्गत लालबहादुर शास्त्री मार्ग येथील मोहन महल ते नागेश सोसायटीपर्यंत पदपथावरील पेव्हर

ब्लॉक्स बसविणे, रंगरंगोटी करणे ई.कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१२, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६४ मधील सन्मा.सदस्या श्री.विलास सामंत यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.१,९८,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,९८,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष अठ्ठयाण्णव हजार मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील

अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

**********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेले आयत्यावेळीचे प्रकरण

आ.वे.प्रकरण क्र.१३ नौपाडा प्रभाग समितीमधील प्र.क्र.६५ मध्ये प्रभाग सुधारणा निधीअंतर्गत ब्राह्मण सोसा., बी-केबीन येथे गटारावरील झाकणे बसविणे, म.गांधी रस्ता येथे कर्बस्टोन बसविणे ई.विविध स्थापत्य कामे करणे या कामास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१३, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी प्रशासनाने केलेल्या शिफारशीप्रमाणे कार्यालयीन कागदपत्रे व त्यावरील अहवाल पाहता, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.६५ मधील सन्मा.सदस्य श्री.संजय वाघुले यांनी वरील विषयांकित कामासाठी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने वरील कामांचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन अंदाजे खर्च रु.२,४५,५५५/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे तांत्रिक मान्यतेनंतर मा.सहाय्यक आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब, वरील विषयांकित काम हे शासन निर्णयास अधिन राहून मा.उपनिबंधक, ठाणे यांनी शिफारस केलेल्या म.का.स.सं. यांचेमार्फत करुन घेणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.२,४५,५५५/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे पंचावन्न मात्र) चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९'अ' अन्वये हि समिती प्रशासकीय मान्यता देत असून, प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे हि समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.सुजाता पाटील    अनुमोदक :- श्री.नारायण पवार

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा
नौपाडा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

**********************

मा.अध्यक्ष महोदया यांच्या पूर्व परवानगीने चर्चेच्या अनुषंगाने घेण्यांत आलेला ठराव

**मा.नौपाडा प्रभाग समिती ठराव क्र.१४, दि.२४.०६.२००९**

**ठराव :-**

ठाणे शहराचा विकास होत असताना, बहुतांशी ठिकाणी रस्ता रूंदीकरणाचे काम करण्यात आले आहे. नागरिकांना व्यवस्थितरित्या चालता यावे त्यासाठी फुटपाथ निर्माण करण्यांत आलेले आहेत. परंतु त्या फुटपाथवर विविध प्रकारचे होत असलेले अतिक्रमण लक्षात घेता ज्या नागरिकांनी रस्ता रूंदीकरणामध्ये योगदान दिले आहे त्यांच्यावर अन्याय होत आहे. तसेच रस्त्यावर असलेले अतिक्रमण त्यामुळे अनेक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मा.महासभा किंवा मा.स्थायी समिती सभांमध्ये वारंवार या विषयी चर्चा होऊन नेहमीच सन्मा.सदस्य आपल्या तीव्र भावना व्यक्त करीत असतात. परंतु प्रशासनामार्फत कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई होत नाही. आज आपण ठाणे शहरात फिरत असताना सर्व शहरात फुटपाथवर अतिक्रमण झालेले दिसून येते. या बाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याने विभाग निहाय रस्त्याचे सर्व्हेक्षण करून वाहतुकीस व नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही अशा प्रकारचे हॉकर्स झोन निर्माण केल्यास व शासनाच्या धोरणानुसार त्या ठिकाणी महिला बचत गट सक्षम करण्यासाठी त्या ठिकाणी आवश्यक तो परवाना देवून भाजीवाले, फळवाले यांना नियोजीतबद्द जागा

उपलब्ध करून दिल्यास शहराच्या सुशोभिकरणाबरोबरच अतिक्रमणामुळे होणारा त्रास निश्चितच कमी होणार आहे. तसेच यापासून आपल्या महापालिकेला काही प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.

सबब, विभाग निहाय रस्त्यांचे सर्व्हेक्षण करून हॉकर्स झोन तयार करणे व महिला बचत गट यांना परवाने देण्याबाबत ही समिती ठराव पारित करीत असून, सदरहू ठराव अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे पाठविण्यात यावा असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- सौ.स्मिता देशमुख          अनुमोदक :- सौ.सुजाता पाटील

सर्वानुमते मंजूर

अध्यक्षा<br>
नौपाडा प्रभाग समिती<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.सहा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर

तद्नंतर मा.अध्यक्ष महोदया सायं.४.५० वा. सभा संपल्याचे जाहीर करतात.

सचिव विभाग,<br>
नौपाडा प्रभाग समिती<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.<br>
दिनांक - २४.०६.२००९

(राजेंद्र फणसे)<br>
प्रभाग अधिकारी /सचिव<br>
नौपाडा प्रभाग समिती,<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

********************************oxo********************************